REGISTER No.

साल अखेर „ „ १ ८८
किरकोळ अंकास ......................६४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........६१ ०६
दुसरे खेपेस .... ......६१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Six monthly........ 3 ............ 8 as
Single copy ......................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line. 2 as

VOL XXXII AKOLA MONDAY 7 NOVEMBER 1898 NO 44

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख ७ माहे नोवेंबर सन १८९८ इ० अंक ४४

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

नोटीस.

नोटीस बनाम संभाजी गणोजी लेवेकर राहणार कसबे पुसद जिल्हे वाशीम. यांस

खाली सही करणार यांजकडून. नोटीसीनें कळवितों कीं, मी कधीं पळून गेलो नाहीं. व बापाला कर्ज नव्हते. मिळकत कांहीं वडिलोपार्जीत व कांहीं तुह्मी आह्मी उभयतांनीं संपादन केली. याजवरून तारीख २४ आक्टोबर सन १८९८ इसवीचे वऱ्हाड समाचारांत दिलेली नोटीस तुमची अगदी खोटी आहे. एकंदर मिळकती पैकीं काहीं शेतें व मकानें आणि जनावरें इतकीच कायती वाटणी झाली आहे. बाकी शेते व लोकांकडून येणें असलेले कर्ज अजमास ४००० च्यार हजार व नगदी रुपये १०००० दहा हजार यांतून मजला तुमचे जवळून वाटणी घेणें आहे ती आज पासून पंधरा दिवसाचे आंत पंच मार्फत निकाल करावा व माझी रसीद घ्यावी. असें तुमचे कडून न झाल्यास एकदम फिर्याद करून रिती प्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल. तुमची बैमानी दिसल्यावरून नोटीस देण्यांत आली आहे कळावे तारीख २९ माहे अक्टोबर सन १८९८ इसवी.

सही
अमृता वल्लद गणोजी
लेवेकर राहणार पुसद.
निशाणी वखर.

---

नोटीस.

मे० महिताबखा पोलीस जमादार जानुमियां नोकर निसबत काजी, सय्यद हातम मुला, शेख अहमद वल्लद महमद गवस, अबासखा वल्लद जफरूदखा, इत्यादि मुसलमान राहणार अडगांव तालुका आकोट यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटिसीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी अदावतीनें माझे अब्रूस धक्का बसावा व माझें नुकसान व्हावें या हेतूनें या गावांतील मुसलमान लोकांची मनें माझ्या विरुद्ध करविण्याची खटपट दांडग्या रितीनें करीत आहां, सबब तुमचे ह्मणण्या प्रमाणें कांहीं लोकांनीं तुमचे दपटशास भिऊन तुमचे कागदावर माझे विरुद्ध सह्या दिल्याचें समजतें. तरी आज पासून आठ दिवसांच्या आंत काय कारणावरून अशी खटपट तुह्मी माझ्या विरुद्ध चलविली आहे तें लेखी कळवावें ह्मणजे मला सरकारांत काम चालविण्यास ठीक पडेल. कळावें. ४ नोवेंबर १८९८ इसवी.

सही
शेख हबीब वल्लद महमद इसब
निशाणी कट्यार राहणार
अडगांव बुजरूक.

---

## जाहिरात

कृष्णा व मलु वल्लद तुळजाजी धनगर वस्ती आकोले तालुकें मजकूर याजकडून जाहिरात देण्यांत येते कीं आमचा भाऊ महादु वल्लद तुळजाजी हा धाकटा असोन तो आणि आह्मी एकत्र असून उदीम वांटा सर्व एकत्र होता फक्त चूल निराळी होती त्यानें मोहोतराची बायको चिंधी मर्द माहादु ही केल्यावर तो एक वर्षाचे आंत मरण पावला त्याचें कर्ज वगैरे आह्मी दिलें व जंगम जिनगी व स्थावर; जिनगीही त्याचे मोहोतराचे बायकोचे ताब्यांत आहे व ती वाईट चालीची निघाली आहे तिनें पोट आणिले ह्मणून ती आमचे कुळांत राहिली नाहीं तिचे ताब्यांत मयत आमचा भाऊ माहादु याची जिनगी होती त्या पैकीं जंगम जिनगिची अफरा तफरा केली व स्थावर माला पैकीं अकोलें प्रगणें तालुके अकोले जिल्हे मजकूर येथील घर दोन आड्याचें व कोठा दोन आड्यांचा असे तिचे ताब्यांत आहे तो माल ती कोणास विकेल अगर गाहाण वगैरे देईल तर तो कोणी घेऊ नये त्याजवर तिचा मालकी बिलकूल नाहीं त्याजवर मालकी आमची आहे व आह्मी वारस असोन वडिलोपार्जीतचा स्थावर माल आहे तिचा हक्क नाहीं जर कोणी तिजपासून खरीदी गाहाण वगैरे घेईल तर त्याची रकम बुडेल असें समजलें जाईल ती मोहोतराची असोन तिजला मुल बाळ वगैरे नाहीं ती बेचालीची आहे आमचे उसंगत नाहीं करिता तिचा हक्क मयताचे जिनगीवर नाहीं. कळावें.

सही
कृष्णा व मलू वल्लद तुळजाजी
धनगर राहणार अकोलें अगरवेस निशाणी खुद्द हातची रेघ असे.

---

## इंग्लंड आणि इंडिया

नंबर ३

(सारासार विचारीकडून)

हिंदुस्थानांत इंग्रजी राज्यास सुशोभित करणारी आणि काळिमा आणणारी अशी काय ती एकच ही वेळ होती. पश्चिमकडील लोकांच्या अप्रतीम शौर्यानें सत्ताधीश मुसलमानांपासून बादशाहीचे सर्व स्वतंत्रता हिरावून घेऊन त्यांच्या गळ्यांत कायमची पारतंत्र्याची बेडी अडकवून दिली हें शौर्य कोलंबस कॉर्टेझ आदिकरून लोकांच्या कृत्यावरून गाजत होतें. एका अंग्ल कवीचें असें मत आहे कीं "History never told of monarch-merchants heroes wandering far, a stranger tale of traffic or of war." बनियेशाईच्या जोरावर इंग्रजी लोकांच्या मनांत सर्व दुनियेंत आपलें तावडें निशाण फडकत राहावें अशी इच्छा उत्पन्न झाली व ती होणेंही स्वाभाविकच आहे. "न्याय आणि कायदा" यांचें तत्व पूर्णपणें लक्षांत ठेवून त्याप्रमाणें मी वर्तन करीन अशा प्रकारची इच्छा जागत्या जागींच दबून गेली असें एडमंड बर्कला मरेपर्यंत वाटत होतें. परंतु वास्तविक पहातां त्यानेंच या सर्व गोष्टीचा विचार केला होता. इंग्लंडच्या इभ्रतीस काळिमा आणणाऱ्या वारन हेस्तिंगच्या खटल्यांत भाषण करितांना जरी एडमंड बर्कनें त्याला शिक्षा दिली नाहीं तरी त्यांचीं मतें हाणून पाडून अंशतः तरी काळिमा पुसून टाकण्याचा प्रयत्न केला. आणि शेवटीं हेस्टिंगस निरपराधी ठरला तरी त्याचे मत नाहीं "That Hastings was acquitted was immaterial" अशा प्रकारचें सत्यास स्मरून आपलें मत प्रसिद्धपणें ठोकून दिलें. वारन हेस्टिंगसच्या खटल्यानें "Asiatics have rights and that Europeans have obligations" हें तत्व मात्र सर्वांच्या मनांत पूर्णपणें वास करूं लागलें आशियांतील लोकांस हक्क आहेत आणि युरोपियनांवर जबाबदाऱ्या आहेत असें प्रतिपादन चालू झालें. आणि "That a superior race is at bound to observe the highest current morality of the time in all its dealings with the subject race" हें न्यायतत्वहीं जिकडे तिकडे वावरू लागलें. जित आणि जेते यांचा संबंध पूर्णपणें जगास दाखविण्याच्या कामांत सत्यप्रियता, न्यायतत्व, इत्यादि गोष्टीस पूर्णपणें महत्व येऊन इतिहासांत त्यांची चमक मारावयास लागली.

वारन हेस्तिंगसनें १७८५ हिंदुस्थान सोडलें, त्यावेळेस पिट हा मुख्य प्रधान असून त्याच्याच कृत्याप्रमाणें हिंदुस्थानांतील राजे लोकांचीं कृत्यें होतीं. पिटनें इंडिआ बिल नांवाचें बील १७८४ सालीं पास केलें आणि त्याच्या योगानें सिव्हील आणि मिलिटरी खात्यांसंबंधानें एकंदर घडामोड करण्याकरितां विलायतेंतील एका मंडळाकडे अधिकार आला. आणि अशा प्रकारें इंग्रज सरकार हें योग्य व्यवस्था करण्याच्या कामांत हिंदुस्थानचे सार्वभौम मालक झालें.

पिट हा फारच राज्यकार्यधुरंधर असून फौजेच्या प्रकरणांत फारच वाकबगार आहे अशा प्रकारची खात्री रोजबरींनें सर्वांस पूर्णपणें करून दिली. त्याचें सर्व लक्ष लढाया जिंकण्याकडे नसून शांतता राखण्याकडे होतें. पार्लमेंटरी रीफार्म नांवाचें बिल त्यानें तीन वेळां पुढें आणलें परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. आयरिश लोकांसंबंधानें व्यापारांत त्यांचाही कांहीं हिस्सा असावा ह्मणूनही त्यानें सूचना केल्या परंतु इंग्रज लोकांनीं त्या सर्व धाब्यावर बसवून कायमचा संबंध जुळवून आणण्याचा प्रसंग टाळला. इ० स० १७९७ सालीं आस्ट्रेलियांत थोडीशी फौज पाठवून दिली आणि हल्लीं उपभोगीत असलेल्या आस्ट्रेलियाचा सार्वभौमत्वाचा पाया त्यावेळेस घातला.

वुइल बरफोर्स, बर्क आणि फॉक्स यांनीं सांगितल्या प्रमाणें पिटनें गुलामाच्या व्यापाराचा प्रश्न फार झणझणीत रीतीनें प्रतिपादन करून हाऊस आफ कामन्स कडून तो कायदा पसारही करून टाकला. बोलण्याच्या पूर्वी त्याला औषध द्यावें लागे इतका तो अशक्त असे तरी तो बोलू लागला ह्मणजे श्रोत्यास थक्क करून सोडीत असे, आणि त्याच्या प्रतिस्पर्ध्यांची तर त्याच्या वक्तृत्वामुळें दाणादाण उडून जाई इ. १७८४ ते १७९३ च्या ९ वर्षांत या प्रमाणें पिटनें सुधारणा घडवून आणिल्या, त्याच सुधारणा हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतही उपयोगीं झाल्या.

वेळेला अनुलक्षूनच लार्ड कार्नवालीस यानें वॉरन हेस्टिंग्सच्या मागून १७८६ त कलकत्यांत पाय ठेवून हिंदुस्थानच्या नकाशांतील तांबड्या भागाच्या सुखदुःखाचीं सूत्रें हातीं घेतलीं रणांगणांत अशिक्षित हिंदुलोकांचा पाडाव करण्यापेक्षां त्यांच्यावर ताबा ठेवून राज्य करणें अधिक कठीण आहे असें त्यावेळेस कंप सरकारास वाटू लागलें होतें. जमीन महसुलाच्या बाबी त्यावेळेस बंगालच्या नबाबा कडेसच ठेविल्या असून जमलेला पैसा कंपनीच्या ताब्यांत दिला कीं आपलें काम संपलें असें कंपनीच्या नोकरा पैकीं कांहींस वाटत असें आणि ह्मणूनच राज्य करण्याच्या आवेशानें स्थापित झालेल्या कंपनीनें रयतेच्या सुखदुःखाच्या वाट्यास हातभार लावण्याचें कबूल केलें नसावें. नबाब आणि त्यांचे हाताखालचे लोक यांनीं फक्त पैसे गोळा करण्याकडेच नजर ठेविली होती परंतु त्या कानांत लागणाऱ्या साधनाकडे अगदींच कानाडोळा केला होता. अशा रीतीनें. कंपनीस पैसा मिळे आणि ह्मणूनच राज्यकारभाराचे जबाबदार आपण नाहींत असें तिला वाटे. दोघांत तंटा आणि तिसऱ्याचा " लाभ या ह्मणी प्रमाणें कोणाचा पाय-

पोस कोणाच्या पायांत नसल्यामुळें रयेतेला मात्र असह्य वेदना सहन कराव्या लागत. " सियर-उल-मुटाखेरिन " नामक ग्रंथकर्त्यानें त्यावेळच्या एकंदर स्थितीवरून पुढील निःपक्षपातीपणाचा अभिप्राय ठोकून दिला आहे. The new rulers paid no attentions to the concerns of the people of Hindustan, and suffered them to be mercilessly plundered, oppressed and tormented by officers of their own appointing.

लार्ड क्लाईव्हच्या नंतर वारनहेस्तिंग्सनें एकंदर राज्यव्यवस्था बदलून टाकली. नवाब लोकाना ताब्यांत घेतलें आणि त्यांच्या सत्तेचा नायनाट केला. बोर्ड आफ रेव्हिन्यु नांवाचे खात्याखाली एकंदर जमाबंदीचा कारभार देऊन सर्व कचेऱ्या कलकत्ता येथें नेल्या. जागोजाग कलेक्टर नेमून त्यांना सर्व फौजदारी अधिकार दिले व न्यायाचें वरिष्ठ कोर्ट कलकत्ता येथें स्थापन केलें. अशा एकंदर गोष्टीवरून हेस्टिंगच्या कारकीर्दीचें परीक्षण होणारें आहे. पेनाच्या फटकाऱ्या सरशी त्यानें सर्व मागील रीतीरिवाजास फांटा दिला. ताब्यांतलि सरदार वगैरे लोकांस शांतता राखण्या विषयीं हुकूम दिला, आणि कोळेवांड अशिक्षित अशा युरोपियन पोरास सर्वत्र अधिकार देऊन राज्यास कधीही सुख न होणारी अशी राज्यव्यवस्था चालूं केली.

लार्ड कार्नवालीस आल्यावर ह्या कलेक्टर लोकांना चांगले सुजाण करण्या विषयीं त्यानें प्रयत्न केला. त्या कलेक्टर लोकाचा पगार अगदीं थोडा ह्मणजे सरासरी वर्षाला १६०० पौंड असे. परंतु इतर अन्य व्यवहार फार राजरोस रीतीनें चालत असत. न्यायखातें आणि मुलकी खातें अशीं तोडून टाकून अलग अलग केलीं. जुलमी राजा शिवाय इतर शांतताप्रिय राज्यांत ज्याप्रमाणें एकंदर शांततेची रयतेस हितकर अशी राज्यव्यवस्था असते त्याच तत्वावर ती स्थापण्याचा प्रयत्न, जागोजाग कोर्टें स्थापून आणि इतर बारीक सारीक गोष्टींत नीट रीतीनें मन घालून त्यानें पूर्ण दशेप्रत आणला. त्याचें पूर्ण ज्ञान असणाऱ्या एकानें लिहिलें आहे.:—

"The Cornwallis code, whether for revenue, police, criminal and civil justice, or other functions, defined and set bounds to authority, created procedure, by a regular system of appeal guarded against the miscarriage of justice, and founded the civil service of India as it exists to this day."

हिंदुस्थानच्या प्रत्येक इतिहासांत सांपडणारी म्हैसूरची लढाई याच्याच कारकीर्दींत घडून आली. टिपूला पादाक्रांत केलें त्याच्या राज्याचा निम्मा हिस्सा घेतला, लढाईच्या खर्चाकरितां ३००००० रुपये घेतले आणि अटी कबूल होईपर्यंत औरस २ पुत्र ओलीस पाठविण्याचें ठरलें.

कॉर्नवॉलीसच्या कारकीर्दीस सुशोभित करणारी अशी फक्त एकच गोष्ट घडून आली ती ही कीं त्यानें बंगाल्यांत कायम धाऱ्याची पद्धत सुरू केली. हल्लीं प्रमाणें त्यावेळेसही कंपनी सरकारच्या जुलमी नोकराच्या असह्य वर्तणुकी मुळें शतकरी लोक कर्जबाजारी आणि दारिद्र्यानें पिडीत होताच. इ. स. १७७१ बंगाल्यांत पडलेल्या भयंकर दुष्काळानें ⅓ लोकसंख्येचा संहार केला. वहित जमिनी पडित पाडल्या, आणि खेडोंखेडीं श्वापदाच्या वस्तीचें ठाणेंच होऊन गेलें. विलायतेतील सरकारचा दडपशा, व पैशाच्या मागण्यानें कार्नवालीसास अगदीं छळू कीं पळ करून सोडलें. आणि यामुळें त्याला अतिशयितच त्रास पडला. त्याणें कित्येक वेळा विलायत सरकारास खालील मजकुराची पत्रें लिहिलीं. " I may safely assert, that one third of the company's territory in Hindustan is now a jungle, inhabited only by wild beast. ' हिंदुस्थानची अशी स्थिती त्यावेळपासूनच आहे असें दिसतें. हे जगन्नियंत्या परमेश्वरा असा उमासमार आणखी किती दिवस काढावयास लावण्याचें तुझ्या मनांत आहे कोण जाणें ! )

पैशाच्या उत्पन्नाच्या मानानें ज्यांनीं ज्यांनीं हिंदुस्थानच्या राज्याकडे पाहिलें असेल त्यांनीं ह्यांनीं कार्नवालीसच्या ह्या पद्धतीचा मनापासून तिरस्कारच केला आहे परंतु ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून रयतेच्या सुखा बद्दल विचार केला आहे त्यांना असें खास आढळून येईल कीं त्यावेळीं अतिशय सुख रयतेस मिळत होतें. कायमधाऱ्याच्या पद्धतीनें बंगाल प्रांत फार सधन झाला आहे व केव्हांही केवढाही दुष्काळ पडला तरी त्याशीं टक्कर देण्यास बिलकूल मागें पुढें पाहणार नाहीं. अशा प्रकारचें अवर्णनीय सुख पांच कोटि लोकांस मिळालें आहे ह्या सुखाचा खरा पुरस्कर्ता जर कोणी असेल तर तो लॉर्ड कार्नवालिसच होय. कायमधाऱ्याच्या पद्धती मुळें सरकारास काय फायदा झाला आहे हें सांगितल्या वाचून आमच्यानें राहवत नाहीं. रयत सुखी असल्यामुळें दंगा धोपा होण्याचा संभव बिलकूल नाहीं व यामुळें प्रजा अराजनिष्ट आहे अशा प्रकारच्या खेदयुक्त अभिप्राया खालीं येण्याचा संभव नाहीं. दुसरा फायदा असा कीं दुष्काळ पडल्यास रयत फंड वगैरे गोळा करून येणाऱ्या त्रासास टाळतात. फार कशाला परवाच्या दुष्काळांत एका जमीनदारानें एक लाख पौंड दुष्काळ निवारणार्थ फंडा कडे दिले होते यावरून कोणाच्याही लक्षांत येणारें आहे.

लॉर्ड कार्नवालीसच्या नंतर सरजॉन शोअर हे आले. यांची कारकीर्द १७९३ ते १७९८ पर्यंत होती. यानीं कायम धाऱ्याची पद्धत बनारस प्रांता पर्यंत वाढविली परंतु हिंदुस्थानला आणि युरोपाला सारखीच घातुक होणारी लढाई सुरू झाल्यामुळें शांततेचा भंग होतो कीं काय असें त्यावेळेस वाटूं लागलें. युरोपमध्यें १७९४ ते १८१५ पर्यंत बहुतेक लढाईचीच दाणादाण चालली होती आणि त्याच प्रमाणें हिंदुस्थानांतही तीच स्थिती होती.

फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या ज्वाळा ज्या वेळेस फ्रॅन्स देशांत भडकूं लागल्या आणि पहिल्या ज्वाळाचा तडाखा ज्यावेळेस बस्टील पर्यंत आला त्या वेळेस शांततेचा भंग न होऊं देण्या विषयीं मना पासून खटपट करून रयतेचा दुवा घेणारा पिट हा कांहीं एक हवला दवल न करितां स्तब्ध राहिला. इंग्लंडांत त्या ज्वाळेचा धूर आणि ठिणग्या येऊं नयेत ह्मणून पिटनें फार परिश्रम केले. त्यानें पारीस मधून आपले वकील परत बोलाविले आणि १७९३ त लुईचा शिरच्छेद झाल्या नंतर फ्रान्सच्या वकीलाला इंग्लंडांतून जाणे विषयीं हुकूम दिला. आणि अशा योगानें फ्रान्सच्या राज्यक्रांतीत इंग्लंडनें आपला मतलब साधण्याचा प्रयत्न केला. ह्या वेळीं इंग्रजी आरमारानें फारच चांगली किर्ती मिळविली. परंतु इंग्रजी सैन्यानें मात्र करावा तसा पराक्रम केला नाहीं. इंग्लंडाचा सुमारें ६०००० लोक रणांगणांत पतन पावला. तोटा सोसावा लागला. आणि अशा भयंकर नुकसानीचें खापर लॉर्ड मेकालेन पिटच्या मस्तकावर फोडून त्याला लढाईची माहिती नाहीं असा अभिप्राय देऊन नालायक ठरविलें.

पिटच्या कारकीर्दीचें वर्णन ज्यानें केलेल्या वरील गोष्टी वरून न करितां त्यानें नेपोलियनला आंतून आंतून पेचांत आणण्याकरितां, पुढें माजणारा भयंकर रण संग्राम टाळण्या करितां, आणि रक्ताचे पूर वाहू नयेत ह्या करितां, रशिया तुर्कस्तान, नेपल्स आणि आस्ट्रिआ इत्यादि राष्ट्रांशी कशकशी संधानें बांधलीं होतीं यावरून कोणीही करील शांतता केव्हां होईल या संबंधानें याचें असें मत असें कीं:—

"The restoration of that lien of princes which for so many centuries maintained the French nation in prosperity at home and in consideration and respect abroad

मॅरेनगीच्या लढाईत नपोलियनला जें काय उत्तर द्यावयाचे होतें ते दिलें आणि नंतर १८०१ मध्यें आस्त्रियानें फ्रान्सशी तह केला. इंग्लंडनें फ्रान्सशी तह केला त्याच वर्षी सतरा वर्षें मुख्य प्रधानाचें काम उत्तम प्रकारें बजावून पिटनें आपल्या जागेचा राजीनामा दिला. संपत्तीचा लोट ज्या राज्यांत संतत वाहतो अशा इंग्लंडला अशा एकंदर भानगडींत सुमारें ८ वर्षांच्या कारकीर्दींत जवळ जवळ ३३४०००००० इतकें पौंड कर्ज काढावें लागल्यामुळें सावकार देणें झालें.

परराष्ट्राशी लढाईच्या बाबतींत ज्या प्रमाणें पिटनें धोरण ठविलें होतें त्याप्रमाणें अंतस्य वंडाळी मोडण्याकडेही त्याचें लक्ष कमी होतें असें नाहीं. पार्लमेंटची सुधारणा करण्याचा प्रश्न त्यानें जागच्या जागींच जिरवून टाकण्याचा प्रयत्न केला. आणि पुन्हा जर कोणी त्याबद्दल प्रश्न उपस्थित करील तर त्याला गुन्हेगार समजावें असें ठरविलें. स्कॉटलंडांतील लोकांना कडक शिक्षा केल्या; मुईर नांवाच्या एका इसमाला १४ वर्षें काळेपाण्याची शिक्षा सुनावली. शिरव्हींग, वार्गारेट, आणि जीरल्ड याना काळे पाण्यावर पाटविलें. माजिस्त्रेटच्या अधिकारा खालीं असलेल्या कोणत्या ठिकाणीं पन्नास पेक्षां अधिक लोकांनीं सभा भरवूं नयेत असें ठरविलें. It is said about Bill that he rather yielded to the public sentiment than led it.

इंग्लंडांत अशी स्थिती होती परंतु आयरलंडांत याच्या १०० पटीनें वाईट स्थिती होती. खून दरवडे, मारामाऱ्या, घराला पेटवून देणें असे गुन्हे तेथें होत होते इतकेंच नव्हे तर तेथें एक भयंकर बंडही उत्पन्न झालें होतें परंतु तें अतिशय कडक उपाय घेऊन तेव्हांच मोडून टाकिलें.

---

# वऱ्हाडसमाचार

मित्ती अश्विन वद्य ९ शके १८२०

हल्लीं इंडियांतील नाण्या संबंधानें मोठा विचार व वाटाघाट विलायतेंत चालू आहे. परंतु त्या चर्चे मध्यें इंडियाच्या लोकांचा पक्ष नीटसा दाखविला जात नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट होय ब्रिटिश सरकार आपल्या बजेटा संबंधानें या प्रश्नाचा खल करितें आणि दुसरी जबरदस्त बाजू युरोपिअन व्यापाऱ्यांची होय इंडियाची तर्फदारी करणारा मुत्सदी कोणी कळकळीचा नव्हतो. इंडिया विषयींचा प्रश्न आहे खरा परंतु याचा निकाल इंडियांतील लोकांच्याच विरुद्ध होईल असें अनुमान आहे. रुपया हें नाणें कृत्रिम कायद्यानें अधीक मोलवान बनविलें आहे आणि त्यामुळें सरकारी कराचे रुपये देतांना प्रजेला पूर्वीं पेक्षां कराचा बोजा अधीक सोसावा लागतो. हा कराचा वाढवा अप्रत्यक्ष आहे ह्मणून तो प्रजेला कांहीं कमी जांचत नाहीं. सध्यां वाद चमत्कारिक चालला आहे. युरोपिअन व्यापारी ह्मणतात कीं इंडियाची भरभराटी होण्याला तिचा माल पुष्कळसा परद्वीपीं रवाना झाला पाहिजे आणि त्यांचा हा सिद्धान्त इतक्या मजलेला पोंचतो कीं इंडियाच्या सांपत्तिक अभिवृद्धीची मूळ किल्ली ह्मणजे निर्यात मालाचा व्यापार होय. या निर्यात व्यापारानें इंग्रजी पौंडामधील भांडवल इंडियांत खेळतें राहतें आणि हुंडणावळीचा भाव बदलून रुपयाची किंमत उतरत गेली व तदनुषंगी सोन्याची किंमत वाढली ह्मणजे इंडियाचा फायदा मोठा होतो. हा सर्वच युक्तिवाद चुकीचा आहे. खरोखर सर्व फायदा युरोपिअन व्यापाऱ्यास मिळतो. नुसतां निर्यात व्यापार वाढविण्यांत इंडियाचें हित नाहीं. या निर्यात मालाच्या चढा ओढीनें इंडियावर मोठा अनिष्टकारक परिणाम घडला आहे. इंडियाचा निर्यात व्यापार ह्मणजे इंडियांत पिकलेल्या मालाचा होय. हा माल पिकवितांना ज्या पदार्थांची बाजारांत चणचण युरोपिअन खरेद्यामुळें विशेष असते ते पदार्थ उत्पन्न केलेले असतात. गेल्या १५ वर्षांत खाण्याच्या धान्याचा पेरा फारच कमी झाला आहे. मि. वाचा लिहितात कीं अन्न-धान्या शिवाय इतर धान्याचे पेरे शेकडा ८१·४ या प्रमाणानें गेल्या १५ वर्षांत वाढले आहेत आणि खाण्याच्या धान्याचा पेरा फक्त शेकडा १२ नें वाढला आहे परंतु लोकसंख्या मात्र शेकडा २२ प्रमाणानें वाढली आहे. वास्तविक स्थिती अशी कीं २४,६७,६३४ टन अन्नधान्याचा पुरवठा कमी पडतो ह्मणजे ९५ लक्ष लोक उपाशी मरतात. भावार्थ असा कीं रुप्याचा भाव उतरला व निर्यात व्यापार वाढला ह्मणून इंडियाची संपत्ति वर्धमान होत होत लोक उपाशीं मरूं लागले वरील आशयाच्या साक्षी करन्सी-कमिटी पुढें झाल्या

आहेत. ९९ लक्ष लोक उपाशी मरतात असें आंकड्यावरून निघतें. याचा अर्थ असा कीं फ्यमिन कमिशन सारख्या कच्या शोधकांनीं मनुष्याच्या प्राणधारणेला जेवढ्या अन्नाचा हिशोब बसविला आहे त्यापेक्षां प्रत्येक माणशी १२॥ शेर अन्न सालिना कमी मिळते. ही सरासरी मोठी भयंकर स्थिती दर्शविते आणि तिच्या परिहारासाठीं सरकारनें योग्य उपाय योजिले नाहींत तर भावी दशा कल्पनेच्या बाहेर दुःखद होईल. अन्न-धान्या पेक्षां ताग, कापूस, चहा काफी इत्यादि पदार्थांचें उत्पन्न अतोनात वाढलें आहे. त्या खेरीज इंडियांतील धान्याचा खजिना देखील राली ब्रदर्स सारखे प्रचंड व्यापारी रिकामा करून सोडीत आहेत. गहूं वगैरे पदार्थाचा व्यापार आमच्या ह्मणण्याचा खरेपणा चटकन लक्ष्यांत भरवील. अन्नाचा पुरवठा कमी कमी होत गेल्यामुळें सरकारी राजकीय रचना देखील ढासळण्या सारखी आहे. उपासमाऱ्यामुळें लोक अस्वस्थ होऊं लागले तर ती गोष्ट राजाला फार बाधक होय.

गेल्या दुष्काळानें एका बाबतींत डोळे चांगले उघडले. अन्नाचा पेरा वाढविण्याकडे लोकांचा कल पुष्कळ वाढला ही आनंदाची गोष्ट होय. परंतु सरकारी सारा प्रजेला इतका भारी जातो कीं अन्नाचा पेरा करून निटसा निभाव लागत नाहीं. या व अन्य-निर्यात व्यापारा सारख्या महत्वाच्या कारणामुळें लोकांचा ना इलाज झाला आहे. वऱ्हाडांत एकंदर जमीन लागवडी खालीं ६६,३०,७१९ एकर आहे त्यांपैकीं गहूं, जवारी, तूर वगैरे अन्नाच्या पेऱ्या खालीं ३९,७६८१९ एकर जमीन असून बाकीच्या जमिनींत कापूस, जवस वगैरे पदार्थ पिकविले जातात. ही गोष्ट सन १८९७–९८ सालाची होय. दुष्काळामुळें सरासरी ९ लक्ष एकर जमीन अन्नाच्या पेऱ्याकडे नेण्यांत आली. पूर्वी वऱ्हाडांत अन्नाचा सांठा फार भक्कम होता परंतु तो इतका कमी झाला आहे कीं गेल्या दुष्काळांत अन्य प्रांतांतून अन्नाचा पुरवठा करावा लागला.

यंदा सरकारी साराच निभण्याची मोठी मारामार पडणार आहे. शेतकरी लोकांस हें साल बरें नाहीं. कापसाचा भाव मंदावला आहे. पाऊस पुरेसा न पडल्या मुळें पुष्कळशी शेती कमजोर होऊन पिकें आठ आणे देखील येतील किंवा नाहीं याची वानवाच आहे. रब्बीचे पीका विषयीं देखील मोठीशी आशा नाहीं. नवीन सारा संपूर्ण वसूल करण्याविषयीं सक्तीचे हुकूम सुटले आहेत. शेतीवर निर्वाह करणाऱ्या लोकांची दुर्दशाच उडेल गरीब बिचाऱ्यांच्या काबाडकष्टाचें फळ ह्मणजे त्यांची सालभराची भाकरी होय. जर सरकारच्या साऱ्या पायीं, सावकाराच्या तगाद्या खालीं किंवा वहितीस घेतलेल्या जमिनीच्या मालकाच्या स्वामित्वाखालीं शेतकऱ्याची भाकरी गडप झाली तर भावी स्थितीचें चित्र काढणें आह्मी वाचकांवरच सोपवितों. सरकारची भूतदया अशा वेळीं निदर्शनास येईल तर लोकांचें कोटकल्याण होईल.

---

## OURSELVES

Our subscribers will, we hope, allow us the usual Dewali Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these days there will be no paper issued on the 14th. current.

---

The Berar Samachar

MONDAY, NOVEMBER 7 1898

## THE LOCAL SELF—GOVERNMENT IN BERAR

The local self—government has a charm for us all. It calls up many pleasant associations of Lord Ripon's viceroyalty. It is the first Indian monument to the good name of Lord Ripon. That noble and proud past claims our first admission to a share in the ad—ministration. The present system marks the beginning of a new revival in our political aspirations. It is the primary school of our political reforms. Its success is to grant us further political franchises and rights. The present local self—government is welcome to us as the fore—runner of a great future wherein we hope to join hands with our rulers to support the Imperial administration of India.

The present local self—government is good because it is like a nursery of a grand prospective local self—government. The experiment is limited in its scope and is restricted to a small branch known as the Local Funds department. The administration of the Local Funds is committed to the care of the District Boards. In the body of the Boards the Government have their representatives in their officers and the people select their men for nomination by the government to act on the Board's committee The measure is intended to give a *living* representation to the people's voice in the administra— of the Local Funds.

The Local self—Government prospers well in Berar. The history of the past years is a good record of its success though we have often to meet with occasional ups and downs in our onward march. The last Local Funds report for 1897—8 has a special claim upon our attention. We are obliged to Mr. R. D. Hare for such a nice, sympathetic and interesting report on this branch of administration. The report is an excellent document and we are glad to welcome the instructions it conveys. The whole tone is full of sympathy for native aspirations and the style is charmingly agreeable. We note with pleasure that our District Board stands first in point of merit and good work. It is a matter of special pleasure and pride that Mr. Dattatraya Vishnu Bhagwat has won the golden opinion of the Resident and the Commissioner. The Akola District Board is a model for the rest of the province and the whole credit is due to the method, fore-thought and energy of our capable and single—minded vice—chairman. We hope to recur to this subject on some other occasion.

---

## वऱ्हाड

**सुट्टी**--पुढील आठवड्यांत दिपवाळीचा मोठा उत्सव असल्यामुळें येत्या सोमवारचा अंक निघणार नाहीं.

पंडित सूरज नारायण असिस्टंट कमिशनर हे प्रकृतीच्या अस्वस्थते मुळें रजेवर जात आहेत.

आणि त्यांच्या रजेंत मि. आग्रेडो ए० असि. कमिशनर हे सिव्हील जज्जचें काम पाहतील.

मि. क्राफर्ड, असि. कमि. खामगांव हे किरकोळ रजेवर बंगलोर कडे गेल्या शनिवारीं गेले.

एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या आफिशिएटींग नेमणूका पुष्कळशा ढळमळल्या आहेत त्यांपैकीं रा. रा. नारायणसिंग बभूतसिंग यास मोर्शीसच तहशिलदार नेमलें आणि मोर्शीच्या दिवाणी कोर्टावर रा. रा. गोपाळ नारायण बापट बी. ए. एल. एल. बी. ए० असि. कमिशनर यांस उमरावतीहून बदललें व त्याप्रमाणें त्यांनीं उमरावती कोर्टाचा चार्ज दिला.

मि० एफ. एल क्राफर्ड असि० कमि० खामगांव यांस १ ले वर्ग माजिस्त्रेटचे संपूर्ण अव्वल अधिकार देण्यांत आले.

वऱ्हाडासाठीं अफू संबंधी नवीन नियम अंमलांत आले होते त्यांची तहकुबी होऊन ते पुढील वर्षाच्या १ ले एप्रिल पासून अंमलांत येतील.

गेल्या आगष्ट महिन्यांत या प्रांतात ९०४९ मनुष्यें जन्मलीं व ५५८८ मरण पावलीं. हा आगष्ट महिना रोगराई शिवाय फार चांगला गेला.

मि० मीर हसमत अल्ली आफि० ए० असि० कमिशनर यवतमाळ यांस १ ले वर्ग माजि० चे समरी अधिकार देण्यांत आले.

मि० सैफुद्दीनखान लालखान यांस परत त्यांच्या क्लार्क आफ कोर्टाच्या मूळच्या जागीं उमरावतीसच नेमल्या प्रमाणें ते तेथें रुजूं झाले.

मे. प्रीडो साहेब डिपुटी कमिशनर हे मुंबईहून परत येऊन गेल्या बुधवारी वाशिमास रवाना झाले

रा० रा० वासुदेव विठ्ठल चांदेकर यांस ही परत तहशिलदारीच्या मूळच्या जागीं दर्यापुरास बदललें व ते तेथें लवकरच रुजूं होतील.

रा रा. बंधुजी नारायण, सिव्हील जज्ज उमरावती हे पुढील महिन्या पासून तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाण्याच्या विचारांत आहेत

मे इलियट साहेब जुडिशिअल कमिशनर यांची स्वारी बुलढाणा जिल्हा तपासून परवां शनिवारीं उमरावतीकडेस गेली.

गेल्या सप्टेंबरांतील डिपार्ट मेंटल परीक्षेचा निकाल येणे प्रमाणें:—

| मिस्टर. | हायर स्टांडर्ड. |
| --- | --- |
| ए. करी असि. कमि. | संपूर्ण—मागील परीक्षेच्या गोळा बेरजेनें. |
| एफ. एल. क्राफर्ड, असि. कमि. | |
| जे. आर. एडवर्डस एक्स्ट्रा असि. क. | |
| मीर अनवरअल्ली एक्स्ट्रा असि. क. | |
| सय्यद मोइनुद्दीन असि. कमि. | फोजदारी, मुलकी व आकौंटस. |
| सोराबजी शापूरजी आफि. तहशीलदार. | लोअर स्टांडर्ड संपूर्ण. |
| डी. डी. दादी मास्तर. | आकौंट व मराठी. |
| दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. आफि० तहशीलदार | मुलकी |
| शाहामहमद इशाक. नायब तहशीलदार | संपूर्ण |
| सय्यद अबदूल कादर ,, | आकौंट |
| सय्यद मझार हुसेन ,, | मुलकी |
| वासुदेव काशिनाथ परांजपे डेपुटी क्लार्क आफ कोर्ट | फोजदारी व मुलकी |
| नारायण मोरेश्वर रहाळकर बी. ए. डेपुटी क्लार्क आफ कोर्ट. | आकौंट |
| रामचंद्र नाराय साठे | दिवाणी व मुलकी |

प्रोफेसर काशीनाथ विनायक छत्रे यांचे सरकसचे खेळ दररोज रात्रीं होत असतात. सिंह, वाघ, हत्ती, घोडे, कुत्रे, अस्वलें वगैरे प्राण्यांचे खेळ फार अप्रतिम आहेत, त्याच प्रमाणें कसरतीचे प्रकार देखील मोठे कठीण व वर्णनीय आहेत. प्रोफेसर छत्रे यांच्या सरकसला सध्यां इंग्रजी सरकसचें रूप आलें आहे इतकेंच नाहीं तर कांहीं कांहीं गोष्टींत इंग्रजी सरकसवर प्रोफेसर छत्रे यांनीं ताण केली आहे मोठ्या आनंदाची गोष्ट कीं ही नेटीव सरकस विलायतेसही नेण्या सारखी आहे. व्यवस्था व इतर टापटीप चांगली असते. हा सरकसचा कारखाना मोठ्या खर्चाचा आहे. त्या खर्चाच्या मानानें येथें लोकाश्रय प्रोफेसर छत्रे यांस मिळाला नाहीं. सुखवस्तु लोकांसाठी आणखी एक खर्चाच्या टिकिटाचा वर्ग काढण्याची सोय वरील कंपनीनें करावी अशी पुष्कळांची सूचना आहे. प्रोफेसर छत्रे यांस सरकसच्यां कामगिरींत उत्कृष्ठ यश येत आहे हें पाहून आह्मी त्यांचे अभिनंदन करितों.

---

### नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफीकीट मिळावे ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

**सन १८६० चा अक्ट २७ कलम ३ प्रमाणें.**

**दि० कि० मुकद्दमा० नंबर ४ वर्ग १९**

१८९८

मुनशी अजीजुद्दीन साहेब असिस्टंट कमिशनर जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टात.

नांव सुरजमल आ० पा० करणार सुंदराबाई मर्द गणेश तर्फे सिवबक्ष राहणार परतवाडा तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर यांस मयत.

गणेश बापाचे नांव रामचंद्र राहणार परतवाडा तालके इलिचपूर जिल्हा इलिचपूर

यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं यांनीं तारीख २८ माहे नवेंबर सन १८९८ इसवी रोजी सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख २६ माहे नवेंबर सन १८९८ इसवी.

Azizuddin

ज्यड्ज.

---

## बोर्डाचे मेंबरांची निवडणूक.

नंबर २

सन १८८९ सालचे जिल्हा बोर्डाचे कायद्याचे कलम १३ अन्वयें रेसिडेंट साहे

होणें अशक्य नसेल तर पुन्हा दहा बारा हजार रुपये खर्च करून तो बांधारा अजिबात तावडतोब काढून टाकावा कारण त्यापाण्या शिवाय दुसरी सोयच नाहीं.

गरीब लोकां पासून कर घेऊन वसूल केलेल्या पैशाचा विनियोग पब्लीक वर्क खात्यांतून कसा होत असतो याचें हें एक मासलें वाईक उदाहरण आहे ही गोष्ट आमचे वाचकांच्या ध्यानांत आल्या वाचून राहणार नाहीं. कळावें.

आपला.
मित्र.

---

वऱ्हाडसमाचार

---

मित्ती कार्तिक शुद्ध ८ शके १८२०

---

इंडियांत साखरेचा खप अतिशय वाढला आहे. गेल्या दहा वर्षांत साखरेची विक्री २ कोट ८ लक्ष रुपयापासून ३ कोट १९ लक्ष १० हजार रुपयापर्यंत वाढली आहे. साखर लोक फार खातात हें चैनांचें चिन्ह असेल तर लोक खरोखरच फार चैनी आहेत हें आह्मांसही कबूल आहे. परंतु साखरेच्या खपावरून रयतेची आबादानी अजमावण्यांत येत असेल तर ती गोष्ट मोठ्या चुकीची होईल. पूर्वी पेक्षां साखर अधिक सुलभतेनें व स्वस्त दरानें मिळूं लागली आहे आणि अलिकडील लोक अधिक चैनी व कफल्लक आहेत. या दोन गोष्टी एकत्र मांडल्या ह्मणजे रयतेच्या आबादानीचा प्रश्न निकालास लागेल. युरोपच्या साखरेचा खप इंडियांत फार वाढला आहे आणि त्यामुळें देशी साखरेचे कारखानें मागें पडत चालले आहेत हा विशेष दुःखाचा प्रकार होय. गेल्या पांच वर्षांत ऊसाचा पेरा देखील कमी झाला आहे. पूर्वी २७,९८००० एकंदर जमिनींत ऊसाचें पीक काढीत होतें त्या ऐवजीं सध्यां २६,९१,७२१ एकंदर जमिनींत ऊस लावतात. बंगाल्यांत जेसोर जिल्ह्यांतील साखरेचे कारखाने फार मागसत चालले आहेत. परराष्ट्रीय साखरे बरोबर टिकाव धरवत नाहीं. परराष्ट्रीय साखरेवर जकात भारी बसवावी आणि त्या रितीनें देशी साखरेच्या कारखान्यास उत्तेजन द्यावें अशा विषयीं बंगालच्या चेंबर्सकडून सरकारला सूचनाही झाली आहे.

इंडियांतली साखर बाजूला टाकून परदेशची साखर इंडियांत खपूं देऊं नये हें अर्थ शास्त्राचें तत्व सरकारासही मान्य होईल असा रंग दिसतो. जें तत्व साखरेला लागूं पडतें तें विलायतच्या कपड्याला कां लागूं पडूं नये हें आह्मास कळत नाहीं. थोडे दिवसापूर्वी अहमदनगरास औद्योगिक शिक्षणा विषयीं बोलतांना डायरेक्टर नामदार जाईल्स ह्मणाले कीं इंडियांत यांत्रिक ज्ञान नसल्यामुळें व औद्योगिक शाळा पुरेशा नसल्यामुळें सर्व कच्चा माल विलायतेस रवाना होतो आणि तो भिन्न भिन्न पदार्थांच्या रूपानें इंडियांत परत येतो, याचा अर्थ असा कीं इंडियाच्या मालावर विलायतच्या लोकास व्यापार धंदा व रोजगार मिळतो आणि इंडियाचे लोक उपाशी मरतात. इंग्रज सरकार औद्योगिक शिक्षण इंडियनांस देण्याविषयीं पराङ्मुख राहतें ह्मणजे या देशाचा अपकर्ष समीप आणीत आहे असा भावार्थ निष्पन्न होतो देशी कारखानें आहेत त्यांची भरभराटी होण्याला विलायतचा माल कमी कमी खपला पाहिजे आणि त्या साठीं विलायतच्या कपड्यावर जकात बसवावी असें आह्मी ह्मणत असतो. अप्रतिबंध व्यापाराचें तत्व सम स्थितीला लागूं पडतें परंतु तेंच तत्व इंडियाच्या विषम स्थितीला लागूं पडत नाहीं पण हें तत्वज्ञान आमचें सरकारास कबूल कसें असेल बरें!

---

आह्मास लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं पंडित सुरज नारायण असिस्टंट कमिशनर, बुलढाणा यांस गेल्या ७ वे तारखेस इंदुर मुक्कामीं देवाज्ञा झाली. अलिकडे बऱ्याच दिवसांपासून यांस मूत्रकृच्छ्राचा विकार बलवत्तर जडला होता. क्षणोक्षणीं त्यांची प्रकृति अस्वस्थ होई. अखेरीस या रोगामुळें त्यांचा अंतकाळ समीप आला आहे असा वैद्यांचा निर्णय झाला. अशा मरणासन्न स्थितींतील पंडित पितृदर्शनासाठीं मोठ्या पराकाष्ठेनें इंदुरास गेले आणि तेथें पोचून अर्धा तास होण्या पूर्वीच त्यांचें देहावसान झालें. पंडित साहेबांस गेल्या सप्तंबर २० तारखेला नुकतेंच ३७ वें वर्ष लागलें होतें. त्यांचा अंत अयोग्य कालीं झाल्यामुळें सर्व आप्तमित्र हळहळ करीत आहेत. पंडित सुरज नारायण मोठ्या घराण्यांतले गृहस्थ होते. त्याचें मूळ वास्तव्य दिल्ली कडे होतें. हें घराणें मोठें श्रीमान असून त्याचा विस्तारही मोठा आहे. १८८१ सालीं २० व्या वर्षी प्रथम ते जव्याची होऊन उमरावतीस आले. पुढें आकोला व जळगांव येथें बदली झाल्या नंतर १८८७ च्या उन्हाळ्यांत त्यांस वाशिमास असतांना असिस्टंट कमिशनरची जागा मिळाली. पुढें स्पेशल असिस्टंट कमिशनर ह्मणून ते इलिचपुरास १८९२ च्या मे महिन्या पर्यंत होते पुढें त्यांची नेमणूक अजमीरच्या दरबारांत मोठ्या हुद्यावर झाली. १८९३ त त्यांस तिकडेच असतांना असिस्टंट कमिशनरी वर्ग १ ची मिळाली. पुढें ते शिकंदराबादेस परत आले आणि गुदस्ता त्यांची बदली बुलढाण्यास झाली. पंडित सुरज नारायण स्वभावतः मोठे प्रेमळ, सरळमार्गी, व सात्विक होते. त्यांच्या श्रीमंतीला व अधिकाराला विनयानें, विद्वत्तेनें व न्यायकुशलतेनें मोठी शोभा आली होती. त्यांस डिपुटी कमिशनरची जागा मिळण्याची संधी अनेकवार आली होती पण ते निस्पृह व मानी असल्यामुळें तो सुयोग जुळला नाहीं. त्यांच्या सद्गुणांची आठवण करून आबालवृद्ध लोक अत्यंत दुःखी आहेत! ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो!

---

दुसरी दुःखवार्ता आह्मास मोठ्या कष्टानें कळविणें भाग पडतें कीं रा. रा. निळकंठ नारायण भट डिपुटी इनस्पेक्टर, उमरावती यांस गेल्या गुरुवारीं उमरावती येथें देवाज्ञा झाली! राजश्री निळकंठराव हे शाळाखात्यांत नांवाजलेले, व विद्वान अंमलदार होते. यांच्या मरणानें एक जुना व अनुभवी अधिकारी नाहींसा झाल्यामुळें वऱ्हाड शाळाखात्याची मोठीच हानि झाली आहे. राजश्री निळकंठराव हे स्वभावानें सरळ व गोड असल्यामुळें यांचा वऱ्हाडांत मित्रसमूह बराच मोठा आहे. त्यांच्या एकाएकी मरणामुळें सर्वांस अत्यंत दुःख होत आहे. मरण समयीं त्यांचें वय ५१ वर्षांचें होतें. यांच्या वृद्ध मातुश्रीस व पत्नीस असह्य दुःख होईल परंतु ईश्वरी सत्ते पुढें काय इलाज!

---

## बोर्डाचे मेंबरांची निवडणूक.

नंबर ३

नियम २ यांतील बाब ( २ ) यांत असें सांगितलें आहे कीं "पेढी किंवा सार्वजनिक कंपनी जी रु० १० किंवा अधिक टाऊनटॅक्स ( पोलिसपट्टी ) देत असेल तिचा गुमास्ता किंवा वहिवाटदार."

ह्मणजे असें कीं ज्या सार्वजनिक कंपनीला १० रु. हून अधिक पोलिसपट्टी द्यावी लागते त्या कंपनीचा गुमास्ता किंवा वहिवाटदार मेंबर होण्यास लायक आहे. परंतु मत देणाराचे लायकी संबंधानें नियम तीन यांत कंपनीचा विशेष उल्लेख केला नाहीं. ही गोष्ट जरा चमत्कारिक दिसते.

तसेंच नियम २ यांतील बाब ( ४ ) इनामदार व जाहागीरदार यांस अमुक शर्तीवर मेंबर होता येतें परंतु मत देणाराबद्दलचा नियम ३ यांत जाहागीरदार व इनामदार यांच्या बद्दल विशेष उल्लेख केलेला नाहीं.

नियम २ यांतील बाब ( ५ ) अन्वयें स्पेशल मॅजिस्ट्रेट व मुलकी आणि पोलिस पाटील ज्यांना तालुक्यांत अधिकार आहे ते मेंबर होऊ शकतात त्याचप्रमाणें नियम ४ वरून ह्या लोकांस मत देण्याचाही अधिकार आहे.

फक्त वतनदार पटवारी यांस नियम ४ ( ब ) अन्वयें मत देतां येतें. तथापि त्याचें नांव नियम २ मध्यें आलें नसल्यामुळें तो मेंबर होऊ शकत नाहीं असें दिसतें.

"तालुक्यांत अधिकार असणारे मुलकी व पोलीस पाटील" असे शब्द नियम २ व ४ यांत वापरले आहेत यावरून अशी शंका येते कीं या लोकांनीं जर मुखत्यारपत्रावरून गुमास्ते दिले तर यांचा हक्क गुमास्त्याकडे जातो किंवा नाहीं. याचा खुलासा वरील नियमांत केलेला नाहीं.

नियम २ बाब ( ६ ) यावरून "तालुक्यात राहणारे देशमुख व देशपांडे यांचे घराण्यांतील" प्रत्येक इसम मेंबर होऊं शकतो. परंतु नियम ४ ( क ) कडे दृष्टी दिली असतां मत देण्याचा अधिकार त्या घराण्यांतील मुख्य पुरुषाकडेसच ठेविला आहे.

या वरील विवेचनावरून वाचकांच लक्षांत आलें असेल कीं वरच्या नियमांत खालीं लिहिलेल्या गोष्टी संशयास्पद आहेत.

( १ ) कंपनीचा गुमास्ता किंवा वहिवाटदार यांचा उल्लेख नियम २ मध्यें जसा केला आहे त्याप्रमाणें नियम ३ यांत कां केला नाहीं ?

( २ ) जाहागीरदार व इनामदार यांचा मेंबराच्या लायकीचे यादींत जसा खुलासा केला आहे तसा मतदाराचे यादींत कां केला नाहीं ?

( ३ ) मुलकी व पोलीस पाटील यांस आपला अधिकार गुमास्त्याला कंपनी प्रमाणें देतां येतो किंवा नाहीं ?

( ४ ) तालुक्यांतील देशमुख व देशपांडे यांच्या घराण्यांतील प्रत्येक पुरुष मेंबर होऊं शकतो. परंतु मत देण्या करितां त्या घराण्यांतील मुख्य पुरुष असला पाहिजे अशी अट आहे ती कां ?

वरील शंकांचें निवारण आपले वाचकां पैकी कोणी करील तर फार बरें होईल. आपचे मतें तर ही विसंगतता दिसते.

( पुढें चालूं )

---

## The Berar Samachar

MONDAY, NOVEMBER 21 1898

The report on Municipalities for 1897—98 is a sequel to the report on Local Boards. Both of them speak well about the progress of the Local self-Government as introduced in Berar. Mr. Hare remarks towards the end that "the municipal committees have made a not unsatisfactory struggle under adverse circumstances." The administration of the Local Boards is certainly more satisfactory than that of the municipalities. We admit that there is an ample scope for improvement in both of these institutions; and it is a pleasure to find that the prospects of good and useful work are within an easy reach. There is no cause for despair but there is a great lack of concerted action. Mr. Hare has written an excellent report on the working of the municipalities. His style is elegant and his broad views command acceptance. A large—minded sympathy and a spirit of moderation characterize these reports. The agreeable instructions they give form their special feature and are of great service for future guidance. The repressive proposal of restricting the number of elected members in the municipalities as well as the other proposal of substituting nomination for election in the Local Boards have no great significance in these reports. Mr. Hare has a praiseworthy ambition to foster the aspirations of the Natives for a share in the administration. And we are glad to request our readers to read and inwardly digest these useful and insteresting annual reports.

There is no more the charm and novelty of the Local Self—Government. People do not evince adequate interest in the administration of these bodies. They have grown indifferent, apathetic and careless about the progress or otherwise of these local bodies. This is no doubt a matter of fact to a certain extent. But the fault does not lie with the people. There is a sort of capering spirit perceptible in the officers of the Government. Further the powers of the municipalities and local boards ought to have been augmented in course of time; but the main rights and privileges have been crippled in a manner to transfer the executive work to the chief control of the government. People make light of the boon of the self—government when they have no responsible work to discharge. Their voice carries no weight, dignity, and influence because it is more ignored than honored, Let us not

minimize the evil effects of the present Imperial policy. The Government of India have been aware of the lack of interest people take in these but chooses to remain silent over the real cause that we have indicated above.

---

We are in receipt of the statement submitted to Indian Currency Committee 1898 by Mr. Dadabhoy Nacroji. It is in the form of a nice pamphlet; and we hope that no Indian who knows English will leave it unread. We cannot do full justice to it in this week but we hasten to quote without an apology the conclusion to which the Grand Old man of Indian has come in this connection:—

" There is the foreign merchant or capitalist of every kind always wanting to save himself in his trade-risks at the cost of the taxpayer, besides using to no small extent, or to the extent of the deposits of revenue in the banks, the revenues of the taxpayers, as his capital for his trade, and besides what is brought back to India, out of the " bleeding " of India as his, the foreign capitalist's capital. Is Government going to inflict oppression upon the Indian taxpayer whenever these " interests " raise a cry and agitation for their selfish ends? Merchants and all sorts of foreign capitalistic exploiters and speculators must be left to themselves. It is no business of the State to interfere in their behalf at the cost of the Indian taxpayers; they know their business; they are able, and ought to be left to take care of themselves. They exploit the country with the Indians' revenue and " bleeding." That is bad enough in all conscience- the profits are theirs, and the losses must be also theirs, and not an additional infliction upon the Indian taxpayers.

It is the " interests " alone that the present selfish system and spirit of Government care for—and though that is some profit to England, it is most destructive to India. If according to the noble words of Lord Mayo, the *people's* true welfare were made the object, England itself will be vastly more benefited than it is at present, and India will also be benefited and will bless the name of England, instead of cursing it as she now begins to do—shut your eyes to it as much as you like. Do as Lord Mayo says, and all difficulties of trade, taxation, finances, currency, famine, plague, unnecessary wars, and last, but not least, of *poverty* and *disaffection* will vanish. The past has been bad, " bleeding, and degrading "—let the future be good yet—prospering and elevating. India then will be quite able to pay as much as may be necessary for healthy government, and *all necessary* progress. "

---

### वऱ्हाड.

' वऱ्हाड सामाजिक परिषदे 'ची वार्षिक सभा येत्या गुरुवारीं सायंकाळीं लायब्ररींत रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्या अध्यक्षते खालीं भरणार आहे.

मि० सी. इ. बिडल्फ असि० कमिशनर हे गेल्या ११ वे तारखेस रजेवरून परत येऊन येथें रुजूं झाले. सध्यां यांच्याकडे अकोला तालुका आहे.

रा. रा सी. शामराव अव्याची व माजि० वर्ग १. अकोला यांची बदली तूर्तातूर्त बुलढाण्यास झाल्यामुळें ते परवां शुक्रवारीं येथून रवाना झाले

मि० बी. क्रे असि० कमिशनर अकोला यांस माजि० वर्ग १ चे अधिकार मिळाले असून त्यांच्याकडे अकोट व बाळापूर तालुक्याचें काम दिलें आहे.

मि० मीर अनवर अली यांस त्यांच्या मूळच्या तहशीलदारीच्या हुद्यावर परत पाठवून बुलढाण्याहून चिखलीस बदलल्यामुळें रा० रा० धोंडू हरी लळींकर यांस परत उमरावतीस कमिशनर कचेरींत डेपुटी क्लार्कच्या जागीं रुजूं व्हावें लागलें पहिली पिच्छेहाट मोठी गहन व गूढ असून बिचाऱ्या जुन्या आफिशिएटींग ए० असि० कमिशनरीला मुकले!

रा० रा० विष्णु रंगनाथ शेंबेकर आफि० ए० असि कमिशनर हे पूर्वे जागीं कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट झाले.

आणि रा० रा० रामराव पाकी यांस तहशीलदारी देऊन मलकापुरास नेमलें. व तेथील अक्टींग गृहस्थ मि० शेख मुनीर यांस मंगरूळपीराला नायब तहशीलदार नेमलें.

मि० अबदूल कदूस तहशीलदार, बाळापूर हे रजेवरून परत रुजूं झाल्यामुळें रा० रा० दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी ए. यांस शेवटी शाळाखात्याची वाट धरावी लागली नेमणुका करितांना सरळपणा व दूरदर्शिपणा दाखवीत नाहींत म्हणून चांगल्या हुशार विद्वानास निराश व्हावें लागतें.

मि० आर डी. हेअर हे इलिचपूरच्या डेपुटी कमिशनरच्या जागीं रुजूं झाले.

आणि राव बहादूर बाळकृष्ण काशीनाथ जोशी याच्या कडेस सध्यां उमरावतीच्या सिव्हील जज्जाचें काम देण्यांत आलें; व रा. रा. बंधुजी जनार्दन हे १ महिन्याच्या रजेवर गेले आहेत.

रा. रा. दामोदर नानाजी शिंदेकर हे दर्यापूर येथील तहशीलदारीचे जाग्यावरून परत येऊन त्यांनीं डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ कोर्टाचे जागेचा चार्ज गेल्या गुरुवारीं घेतला. आणि त्यामुळें त्यांच्या वर्गा वर्गींत बदललेले गृहस्थ आपापल्या जागीं परत गेले.

मे. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर, आकोला यांची स्वारी या आठवड्यांत खालील मुक्कामा प्रमाणें फिरणार आहे:—

| गांव | नोवेंबर |
|---|---|
| सांगळूद बुा | २१ |
| भैसांग | २२ |
| पळसोद | २३ |
| कुरणखेड | २४ |
| पातुरनंद्रापूर | २५ |
| पिंजर | २६ |
| सावरखेड | २७ |
| महान | २८ |
| बारशी टाकळी | २९।३० |

---

## वऱ्हाड शिक्षक समाज

सन १८९८ इसवी

कामाचें पत्रक

बुधवार तारीख २३ नोव्हेंबर

सकाळीं ११ पासून दुपारीं १ पर्यंत

(१) मे० डायरेक्टर साहेब बहादूर यांजकडून समाजाचे कामाची सुरुवात.

(२) शिक्षक समाजाचे सेक्रेटरी यांनीं तयार केलेला मागील सालचा रिपोर्ट वाचला जाऊन तो समाजाचे पसंती साठीं ठेवणें.

( ३ ) प्रांतांतील शाळांतून आलेल्या चौथ्या व सहाव्या इयत्तांतील विद्यार्थ्यांच्या मोडी व उर्दू पुस्त्या तपासून पाहून त्यांतून उत्तम पुस्त्यांची निवड करण्यासाठीं दोन सब कमिट्या नेमणें.

( ४ ) शिक्षक समाजाच व्यवस्थापक सभासदांकडून आलेल्या सूचना वांचून दाखविणें; आणि त्यांपैकीं योग्य ठरतील त्या इनस्पेक्टर सभेकडे पाठविणें.

दुपारीं २ पासून ४ पर्यंत

(१) रा० रा० एन. आर. पटवर्धन से० अ० मा० इंग्लिश मराठी शाळा मलकापूर हे मराठी ६ व्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांना तिसरी हैसूरची लढाई हा विषय शिकवून दाखवितील.

(२) रा० रा० द० वि० भागवत वकील अकोला हे सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहायानें रुधिराभिसरण कसें चालतें हें दाखवितील व तत्संबंधी दुसऱ्या पुष्कळ गोष्टींची माहिती सांगतील.

गुरुवार तारीख २४ नोवेंबर

सकाळीं ११ ते १ पर्यंत

(१) अकोला व उमरावती या दोन्ही हायस्कुलांतील शिक्षक वेगळे ठिकाणीं जमून हायस्कुलांतील इयत्तां करितां कोणतीं पुस्तकें पुढील साला करितां ठेवावीं वगैरे बद्दल विचार करितील व आपले कामाचें टिपण दाखल करितील.

(२) आंग्लो व्हर्नाक्युलर शाळांचे सर्व शिक्षक एकत्र जमून आपले शाळांतील शिक्षणसंबंधी येणाऱ्या अडचणी कशा दूर कराव्या याबद्दल विचार करितील व केलेल्या कामाचें टिपण दाखल करितील.

(३) मराठी शाळांचें सर्व शिक्षक एकत्र जमून आपले शाळांतील शिक्षणासंबंधानें व इतर अडचणी संबंधानें विचार करितील व ते आपले कामाचें टिपण दाखल करितील.

(४) हिंदुस्थानी शाळांतील सर्व शिक्षक व ट्रेनिंग कालेजांतील हिंदुस्थानी मास्तर हे एकत्र जमून हिंदुस्थानी शाळांतील शिक्षण संबंधी कांहीं अडचणी येत असल्यास त्याचा विचार करितील व आपलें कामाचें टिपण मराठींत दाखल करितील.

दुपारीं २ पासून ४ पर्यंत

१. रा. रा. रघुनाथ वामन देवभानकर बी. ए. हेडमास्तर इ० म० शाळा जळगांव हे एका शालोपयोगी विषयावर निबंध वाचतील.

२. रा. रा. लक्ष्मण गोपाळ सहस्त्रबुद्धे असिस्टंट मास्तर इंग्लिश मराठी शाळा आकोला हे पचनक्रियेवर निबंध वाचतील.

३ रा. रा. जयराम गोपाळ शृंगारपुरे असिस्टंट मास्तर इंग्लिश मराठी शाळा उमरावती हे इंग्रजी १ल्या इयत्तेंतील मुलांस मराठीचें इंग्रजी भाषांतर शिकवून दाखवितील.

शुक्रवार तारीख २५ नोव्हेंबर

सकाळीं ११ पासून दुपारीं १ पर्यंत

रा रा. काशीनाथ नारायण पटवर्धन हेडमास्तर चांदूर हे वनस्पती शास्त्रांतील कांहीं विवक्षित भागावर भाषण करितील.

१ चालू सालचे जमाखर्चाचें पत्रक व १८९९ सालाकरितां सेक्रेटरीनें तयार केलेलें अंदाज पत्रक पसंत करणें.

२. रा. रा. रघुनाथ कृष्ण. फर्स्ट असिस्टंट मास्तर म्युनिसिपल मराठी शाळा नंबर २ हे मराठी ३ऱ्या इयत्तेला भूगोल शिकवून दाखवितील.

दुपारीं २ पासून ४ पर्यंत

१. रा. रा. रामचंद्र सदाशिव लेले आं. मराठी शाळा मलकापूर जरासंधवधावर टीका या विषयावर निबंध वाचतील.

२. रा. रा. रामचंद्र वि० धर्माधिकारी बी. ए अ० मा० हायस्कूल, अकोला हे एका शास्त्रीय विषयावर सप्रयोग व्याख्यान देतील.

शनिवार तारीख २६ नोव्हेंबर

सकाळीं ७ पासून ९. पर्यंत

( १ ) रा. रा का० ना० साने यांजकडून आलेल्या मराठी भाषेच्या लेखन पद्धती संबंधी टिपणावर समाजाचा विचार वर्णे.

( २ ) पुढील साला करितां अध्यक्ष व सेक्रेटरी यांची नेमणूक करणें.

( ३ ) आयते वेळीं आलेल्या सूचनांचा विचार करणें.

( ४ ) समाजाचे अध्यक्षाकडून समाजाचें विसर्जन.

दुपारी ३ पासून काम संपेपर्यंत.

( १ ) शिक्षक समाजाचे सेक्रेटरी व इनस्पेक्टर सभेचे सेक्रेटरी हे आपापल्या समाजांत झालेल्या कामाचा रिपोर्ट वाचतील.

( २ ) मे० डायरेक्टर साहेब बहादूर यांचें भाषण व सभेचें त्यांचे कडून विसर्जन.

अकोला. शंकर नारायण डागे.
ता० ३०।१०।९८ गणेश रामचंद्र दामले.
सेक्रेटरी शिक्षक समाज.
अकोला.

---

### नोटीस.

साळुबाई मर्दे वहेदीन देशमुख राहणार मौजे सुटाळ खुर्द तालुके खामगांव इजला खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा व माझा एक भ्रतार असून सुमारे चार वर्षें होतील आपले भ्रतारास देवाज्ञा झाली त्या नंतर तुम्ही वडील असल्यामुळें व आपले पोटी संतान नसले कारणांनीं भ्रताराचे नांवानी असलेले सेताचे खाते तुमचे नांवनीं लागले. तुम्ही मजला कांहीं जिंदगी न देता घरांतून काढून वेगळे करून खाण्यापिण्यास देण्याचें बंद केले. तुम्ही व आम्ही जिंदगीचे समान हक्कदार आहोत यास्तव भ्रताराची जी कांहीं स्थावर जंगम मिळकत असेल त्याचा विभाग निमे मजला एक महिन्याचे आंत करून द्यावे व सेताचे मिळकतीचे उभयता मालक असल्यामुळें तुम्हास एकट्यास विक्री करण्याचा हक्क नांहीं व केल्यास ती निरर्थक समजली जाईल.

श्रीराम सालीग्राम दुकान खामगांव यादुकानचे कर्जाच्या भ्रतारानीं ६ किस्ती सेती गहान देऊन केल्या असून तुम्ही एक किस्त गुदस्ताची पाडली तीन वर्ष सारख्या किस्ती तुम्ही दिल्या नाहींत पडली किस्त तुमची तुम्ही देऊन पुढें तीन किस्ती मजला फेडावयाच्या. सबब हल्लीचे पीक निघाल्यावर जमीन मी तयार करून पेरणार हरकत केल्यास सर्व बाबतीबद्दल योग्य कोर्टांत तजवीज करीन. हे आपणास कळावे तारीख १९ माहे नोवेंबर सन १८९८ इसवी.

दस्तुर रामकृष्ण राजाराम पि० रायटर.

सही.
सकीना मर्दे वहदीन देशमुख
वस्ती मौजे सुटाळखुर्द
निशाणी बांगडी. ०

---

## वर्तमानसार

पारिस शहरांत इसवी सन १९०० साली जें जगमदर्शन भरावयाचें त्याकरितां जो कोणी अद्भुत शोधाची नवी क्लृप्ति काढील त्यास अति मोठें बक्षीस दिलें जाईल अशी जाहिरात हें प्रदर्शन भरविण्याचा पुढाकार घेणाऱ्या मंडळीनें दिली होती तें अद्भुत मंडळीस एम. झेपानिक नांवाच्या पोलंडच्या एका पंतोजीनें मिळवून दिलें असें ह्मणतात. हें अद्भूत ह्मणजे दूरच्या अंतरावरील जशाचा तसा देखावा तारेनें पाहण्याची कल्पना एम. झेपानिक ह्या कुशल पुरुषानें शोधून काढली आहे. हें शतक नव्या अद्भुत शोधाचें आहे कारण ह्या शतकांत जगाचें स्थित्यंतर करणारे, मनुष्याची सुखसोय वाढविणारे, मनुष्यांच्या व्याधि निरसन होण्यास, ज्ञान वाढविण्यास, आणि परमसमर्थ जो परमेश्वर त्याच्या अपार चातुर्याचें ज्ञान मनुष्य जातीस होऊन त्याच्या चरणारविंदी लीन होण्यास कारणीभूत होणारे असे कित्येक नवे शोध झाले आहेत त्यांपैकींच हा एक नवा शोध होय असें ह्मणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. परमेश्वराच्या सृष्टिरूप पुस्तकाच्या काळजीपूर्वक अवलोकनाचा आणि अध्यायनाचा हा परिणाम आहे. ह्या सृष्टिरूप पुस्तकाचें काळजीपूर्वक अध्ययन करून असे नवे शोध आमचे लोक कधीं करूं लागतील ! ! !

ह्या नव्या शोधाची जी कांहीं त्रोटक माहिती बाहेर आली आहे ती आह्मी येथें जशीच्या तशीच देतों:—

एम्. झेपानिक यानें ही नवी युक्ति काढून ती पारिसच्या प्रदर्शन कमेटीस कळविली. त्या कमेटीपुढें व त्या कमेटींत जे मोठे शास्त्रज्ञ होते त्यांच्यापुढें ह्या नव्या शोधाचे कित्येक प्रयोग ह्या नव्या शोधाच्या जनकानें करून दाखविले त्यावरून तो नवा शोध फार उत्तम आणि बहु मोल आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. ह्या नव्या शोधाचें मोल आज करणें अगदीं अशक्य आहे. जगांत जसजसा त्याचा उपयोग वाढत जाईल तसतसें याचें मोल ही वाढत जाईल.

ह्या नव्या शोधाचें नांव त्याच्या जनकानें "टेलिक्ट्रोस्कोप" असें ठेविलें आहे. हल्लीं तारेनें जशी लांबलांबची बातमी आणि टेलिफोननें लांब ठिकाणच्या लोकांचें भाषण असें त्वरित समजतें आणि ऐकूं येतें, याचप्रमाणें ह्या "टेलिक्ट्रोस्कोप" नें लांबलांब अंतरावरचे देखावे, स्थिति. आप्तस्वकीय माणसें, आणि सर्व कांहीं दृश्य तेवढें दिसतें. तारेला, टेलिफोनला जसा वीज हा घोडा आहे, तसाच ह्या नव्या यंत्रासही तोच आहे.

ह्या नव्या शोधाची तपशीलवार हकीगत शोधकानें अद्याप गुप्त ठेविली आहे तें उत्तमच आहे. कारण आपल्या शोधाचा फायदा आपल्यास मिळावा अशी बुद्धी असणें हें साहजिकच आहे. ह्या नव्या शोधाची किंमत जेवढी करावी तेवढी थोडीच आहे असें कल्पिलें असतां मोठासा बाध येईल असें को णीही ह्मणणार नाहीं. ज्या आपल्या दुरदेशीं आप्तस्वकीयांस स्वतः जाऊन पहाण्यास आपण असमर्थ आहों तो ह्या नव्या यंत्रानें दृष्टीस पडला असतां मनाला किती तरी समाधान होईल बरें ! याचप्रमाणें जगमदर्शन सुरवातीचे अपूर्व समारंभ, भयंकर अपघातांच्या ठिकाणचे रोमांच उभे करणारे देखावे, व दुसरे शतशः अद्भुत देखावे प्रत्यक्ष पहाण्यास सर्वच लोक समर्थ नसतात ते ह्या नव्या यंत्रानें दिसून प्रत्यक्ष दर्शनतृष्णा तृप्त होईल. मिळून द्रव्यसाह्य असलें ह्मणजे बसल्या ठिकाणाहून सर्व जग पहाण्यास कोणतीच अडचण पडणार नाहीं. जगाच्या स्थितींत ह्या नव्या शोधानें घवाड स्थित्यंतर होईल, आणि त्याचें मोलही मनुष्यास करितां यावयाचें नाहीं.

ह्या शोधकाची ख्याति त्याच्या हयातींत होऊन तो क्रोडोपती होईल ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय. आपापल्या बुद्धिवैभवानें आणि कल्पनाशक्तीनें जगाच्या कल्याणास ज्यांनीं ज्यांनीं भर घातली त्या मालिकेंत बसून अजरामर कीर्तीस वरणें हें भाग्य अगदींच थोड्या पुरुषांस प्राप्त होतें. भूमातेचे हेच खरे सुपुत्र होत. शू० सू०

१८९७।९८ सालीं पंजाबांत व्यापाराची मंदी असतां इन्कमटाक्साचा वसूल ७१,००० रुपये जास्त झाला.

सरहद्दीवर १०० महसूदलोकांनीं आणखी एक लूट करून तीन शिपाई मारले.

आस्त्रियांत व्हायना येथें प्लेगनें एक कामदार मेला व त्याची उजूतबाजू ठेवणारां पैकीं एक डाक्टर व एक दाई हीं लागून डाक्टरही मेला.

जपान सरकार आपल्या दिवाणी कायद्यांत दुरुस्ती करीत असून ती बहुत्येक दुरुस्ती जर्मनींतल्या कायद्याप्रमाणें होणार आहे. जपानास हल्लीं जर्मनीचेंच सगळें आवडूं लागलें आहे.

आफ्रीकेंत काम करणाऱ्या हिंदुस्थानांतल्या लष्करी आफिसरांस रोज ४ रुपये प्रमाणें भत्ता देण्याचें ठरलें.

फाशोडा प्रकरणाबद्दलचा फ्रान्स व इंग्लंड यांच्या दरम्यानचा लढा आपसांत मिटला. फ्रान्सानें तें ठिकाण सोडून देण्याचें कबूल केलें.

समरकंद येथें प्लेग सुरू झाल्यानें रशियन राजधानींतल्या लोकांस भीती वाटूं लागली.

हल्लीं रूस देशानें एक अपूर्व मूर्ति धारण केली आहे. नामदार झारांनीं प्रसिद्ध केलें आहे कीं, सर्व युरोपियन राजांनीं आपापली फौज कमी करून टाकावी! हा विचार उत्तम आहे व सर्वांच्या आदरासही पात्र आहे! एका हातांत तीक्ष्ण धारेची तरवार धरून दुसऱ्या हातांत अभयाचें चिन्ह धरावयाचें. आणि युक्तीनें चीन देशाला आपल्या खाकेंत धरून आपलें पोट भरून जणु काय इंग्रज सरकाराला तीक्ष्ण धारेची तरवार दाखवून रूस ह्मणतो कीं, इंग्रज, तुह्मी इकडे येऊं नका, चीन देशांत आपला विस्तार वाढवूं नका; जर तसें कांहीं कराल तर ही चकचकीत तरवार ध्यानांत ठेवा ! वीरमदानें उन्मत्त झालेला हा रूस एका जागीं आपला लग्गा साधून दुसऱ्या जागीं चांगल्या माणसाचें लक्षण दाखवीत आहे.

रूस ह्मणतो कीं, हल्लीं युरोपांत प्रत्येक राजानें सैन्यवृद्धी, रणतरीवृद्धी व शस्त्रास्त्रवृद्धी करण्याचें चालविलें आहे, पण याचा शेवट कोठें हें कोणीच सांगूं शकणार नाहीं या करितां प्रत्येक राजावर खर्चाचें जें मोठें ओझें पडलें आहे तें कमी होण्याकरितां प्रत्येक राजानें आपली फौज कमी केली पाहिजे. सगळ्या पृथ्वींत शांतींचें राज्य चालेंलें पाहिजे व त्या भविष्यशांतीकरितां सर्व राजांनीं मिळून एक कमेटी नेमली पाहिजे, असें रशियाचें ह्मणणें आहे.

रशियाच्या तोंडचें हें शांतिस्तोत्र ऐकून सर्वांस आश्चर्य वाटत आहे! आतां पासून कोणीहि मत्स्य खाऊं नका हें मांजराचें ह्मणणें आणि रक्त न पिण्याचा मी आतां निश्चय केला असल्यामुळें तुह्मी माझ्याजवळ येऊन बसा हें वाघाचें सांगणें, यांपैकींच रशियाची ही शांतीसूचना आहे. रशियानें शेकडो वर्षे लढाया करून व लक्षावधी माणसांस ठार मारून मध्यएशियाचा बहुतेक भाग आपल्या हातांत घेतला आहे, आणि आतां हें शांतिस्तोत्र पुढें येत आहे. तेव्हां यांतलें इंगित सहज समजण्यासारखें आहे. चीनच्या खटपटीकरतांच त्याचें हें शांतिस्तोत्र असेल तर कोण जाणे. ठा०

विजेचा बनवलेला टपालचा शिपाई !– जिनिव्हा येथें मोठमोठ्या वाड्यांत उंच मजल्यांपर्यंत टपाल वाटण्यास टपालचे शिपायास जावें लागत नाहीं. तेथें तळमजल्यावर पत्राची पेटी ठेविलेली असते. ज्या त्या वाड्यांतील पत्रें त्या पेटींत टाकावी आणि तेथें विजेची घाट असते ती वाजवावी ह्मणजे टपाल आल्याची सूचना वाड्यांतल्या सर्व बिऱ्हाडकरास मिळते. मग ती पेटी मजल्यामजल्यावर विजेच्या यंत्रानें थांबत थांबत जाते. व तेथें तेथें ज्या त्या मजल्यावरचे लोक आपापलीं पत्रें निरनिराळ्या नियमित खणांत टाकलेलीं असतात तीं काढून घेतात. जिनिव्हा येथें ही टपाल वांटण्याची पद्धति सुरू झाली आहे खरी; परंतु तेथल्यापेक्षां या युक्तीचा उपयोग न्यूयार्क फिलाडेल्फिया, बोस्टन वगैरे अमेरिकेतल्या मोठमोठ्या व वीस वीस मजले उंचीच्या शहरांत फार होण्यासारखा आहे. टपालचे शिपायास वीस वीस मजले चढायला नको व पत्रें वांटीत हिंडण्यालाही नको. तळमजल्यावर ज्यांचीं त्यांचीं पत्रें पेटींतल्या ज्याच्या त्याच्या खणांत टाकलीं आणि विजेची घाट हालविली कीं, सर्वांस आपलें टपाल आल्याची वर्दी लागून जो तो आपापलीं पत्रें टपालचे पेटीच्या यंत्राजवळ येऊन घेऊन जात जाईल. ज्ञा० च.

पंजाबांतील ज्यायंठ ज्यज्य गुरुदयाळसिंग यांना कामांतून दूर केल्याचें वाचकांस विदीत आहेच. आतां त्यांजवर खटला करण्याला सरकारानें मंजूरी दिल्याचें समजतें. आणखी असेंहि ऐकण्यांत आहे कीं, सरदार गुरुदयाळसिंग हे हिंदुस्थानांत नसून विलायतेस गेले आहेत. तिकडे ते पुढील कांहीं प्रयत्नाकरितां गेले असतील असें वाटतें.

विलायतेस मि. वर्डेड यांनीं एका शास्त्रीय मंडळीपुढें गांठीच्या तापावर एक निबंध वाचून दाखविला. त्यांतील थोडीशी माहिती आह्मी वाचकांस देतों:– बासीली नांवाच्या कृमीपासून या तापाची उत्पत्ती आहे. हे कृमी इतके सूक्ष्म आहेत कीं, त्यांची लांबी एका इंचाचे सहस्रांश आहे आणि रुंदी एक पंचवीस हजारांश इंच आहे ! ह्मणून तर हे मोठ्या दुर्बीणीवांचून दिसत नाहींत. यांचा आकार वाटोळ्या टोंकाच्या दांडक्यासारखा आहे. यांना चांगलें खाद्य मिळालें ह्मणजे त्यांची वाढ फार जलद होते. प्राण्याचे रक्तद्रव्यांत यांची वृद्धी होण्याची तऱ्हा अशी आहे कीं, प्रत्येक कृमी प्रथम थोडा लांब होतो, नंतर एकाचे दोन, दोहोंचे चार अशा गणित श्रेढीनें वाढ होते. पोषक द्रव्य संपलें ह्मणजे त्यांची वाढ संपते, तथापि ते एकदम मरतात असें नाहीं. कैक वर्षें नुस्ता प्राण धरून राहतात. उघडी हवा त्यांना काळासारखी आहे. त्या हवेंत ते फार दिवस टिकत नाहींत, सात आठ दिवसांत त्यांचा फडशा उडतो. रोगी मनुष्याचे शरीरांतून निघून हे हवेंत घुरळ्यासारखे तरंगत असतात परंतु मोकळ्या हवेनें व प्रकाशानें हे क्षीण होऊन एक दोन दिवसांतच मरतात ओलसर जागेंत आणि कोंडलेल्या हवेंत या किड्यांना चरायाला खुशाल सांपडते. उंदरावर प्रथम यांची धाड पडते, मागून मनुष्याचा संहार होतो.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफीकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८६० चा अक्ट २७ कलम ३ प्रमाणें.

दि० कि० मुकद्दमा नंबर ५ वर्ग १९

---

१८९८

मुनशी अझिजुद्दीन साहेब असिस्टंट कमिशनर साहेब जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव सुरजमल आ० पा० करणार सुंदराबाई मर्द गणेश तर्फे सिवबक्ष राहणार परतवाडा तालुक इलिचपूर जिल्हा इलिचपूर यांस. मयत

गणेश बापाचे नांव रामचंद्र मारवाडी राहणार परतवाडा तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर.

यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं यांनीं तारीख ३० माहे नवेंबर सन १८९८ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या अवेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २९ माहे १० सन १८९८ इसवी.

Azizuddin
व्यहूज.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

STER No. N 4

[illegible] „ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly........ 3 .............. 8
Single copy ................................4

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 a
Repetition Per line...3 a

VOLXXXII | AKOLA MONDAY 21 NOVEMBER 1898 | NO 45

वर्ष ३२ | आकोला सोमवार तारीख २८ माहे नोवेंबर सन १८९८ इ० | अंक ४६

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी-च्या १ ले तारखे पासून तें डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई व्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## नोटीस.

रा० रा० शंकर वल्लद पांडोबा सोनार राहणार किन्ही तालुका वाशीम.—यांस.

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मला नीटपणें वागवीत नाहीं. मारहाण करून तुह्मी मला घरा बाहेर घालवून दिलें. त्या गोष्टीला आज आठ वर्षे होत आलीं. पुढें पंच मार्फत सांगा सांगी होऊन तुह्मी मला यथाशास्त्र वागविण्याचे कबूल केल्या वरून मी तुमच्या घरीं येऊन राहिलें. परंतु तुमचा हेतु लबाडीचा असल्यामुळे तुह्मी मला क्रूरपणानें वागवूं लागला, पोटापाण्यानें उपाशी मारूं लागला. व अखेरीला मला जीवाचीच धडगत दिसेना ह्मणून मी मोठ्या युक्तीनें माझ्या बापाच्या घरी येऊन राहिलें. तुह्मी दुसरी गंधर्वाची बायको केली असून तुमचे सर्व ढंग माझा संहार करण्यार्थ घालविण्याचे आहेत तुमच्या जवळ राहणें धोक्याचें आहे. माझी पोटापाण्याची सोय नाहीं सावकारी कर्ज १५० रुपये होऊन गेलें. माझ्यावर नवरेपणाचा हक्क कायम ठेवावयाचा असेल तर सावकाराचे कर्ज देणें देऊन टाकून मला दरमहा चार रुपये पोटगी देत जावी. ही नोटीस पोचल्या पासून आठ दिवसांचे आंत वरील कर्जाची फेड व पोटगीची व्यवस्था न होईल तर कोर्टं मार्फत हुकूम मिळवून तुह्मावर अमलबारी केली जाईल. कळावें. तारीख २० नोवेंबर सन १८९८ इसवी.

सही.
बायजा मर्द शंकर सोनार राहणार.
सखाराम वल्लद बाळाजी सोनार
वस्ती अंजनगांव निशाणी
बांगडी

## वऱ्हाड शिक्षक समाज.
### सभेंत झालेल्या कामाचा रिपोर्ट.

अकोला बुधवार तारीख २३-११-९८
सकाळीं ११ ते १ पर्यंत.
हजर असलेल्या शिक्षकांची संख्या १२७.

१ मेहरबान डायरेक्टर साहेब बाहादूर यांनी समाजाच्या कामास ११ वाजल्यावर सुरुवात केली. त्यावेळीं त्यांनीं खालील आशयाचें भाषण केलें:—ते ह्मणाले.

मित्रहो, आज एका वर्षा नंतर आपली सर्वांची येथें गांठ पडली, त्यामुळें मला फार आनंद होत आहे. सभेच्या कामास सुरवात करण्या पूर्वी कांहीं गोष्टींचा मला येथें उल्लेख केला पाहिजे. गेल्या सालीं आपल्या खात्यातील कांहीं ठळक गृहस्थ मृत्युमुखीं पडले कैलासवासी रा० रा० बाबासाहेब परांजपे, गणपतराव वैद्य व निळकंठराव भट, हे तिघे गृहस्थ गेल्या सालीं समाजास हजर होते. शिवाय रा. रा. बाळकृष्ण शास्त्री बापट यांनीं पेनशन घेतल्या मुळें आणखी एक अनुभविक गृहस्थ खात्यांतून कमी झाले. या सालांतच सरकारानें एज्युकेशनल इन्स्पेक्टरची जागा कमी केल्यामुळें महाजनी साहेबांस दोन जिल्ह्यांचें काम सांगावें लागलें. या सर्व गोष्टी आपल्या हातच्या नसल्यामुळें, त्या बद्दल विशेष खेद न मानितां आपल्या हातून होईल तशी कामगिरी बजावणें हें जें आपलें काम तें कसें तरी पार पाडलें पाहिजे.

मला या प्रांतांत आल्यास पाच वर्षे झालीं इतक्या अवकाशांत मी ज्या वेळोवेळीं सूचना केल्या त्या जशा अमलांत यावयास पाहिजे होत्या, तशा आल्या नाहींत. प्रायमरी स्कूलमध्यें जसा अभ्यासक्रम असावा ह्मणून मी सरक्युलर केलें होतें तसा क्रम अद्यापि अमलांत आला नाहीं. इंग्रजी मराठी शाळा व हायस्कुलें यामध्यें सुद्धां माझ्या सुचना कडे बरोबर लक्ष दिलें गेलें नाहीं आणि विशेषें करून भाषांतर व कॉपी रायटींग या मध्यें फारच उणीव दिसून येते. त्याचप्रमाणें ट्रेनिंग कॉलेजामध्यें नवीन शिक्षणक्रम सुरूं करून आज दोन वर्षे झालीं त्या मध्यें तर मुळींच यश आलें नाहीं. या उणीवा असण्याचीं कारणें कोणतीं त्यांचा तुह्मीं विचार करावा. आणि त्या होतील तितक्या नाहींशा करण्याचा प्रयत्न तुह्मी कराल अशी मला आशा आहे.

( २ ) नंतर समाजाचे सेक्रेटरींनीं म्यानेजिंग कमिटीचा चालूं सालचा रिपोर्ट वाचला. व इनस्पेक्टर मंडळी व शिक्षक समाज आपापलें काम सुरूं करण्यास निरनिराळे झाल्यावर रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर, हेडमास्तर उमरावती हायस्कूल यानीं, वाचलेला रिपोर्ट मंजूर करण्या विषयीं सूचना केली व तीस रा. रा. विश्वनाथ मोहनीराज धर्माधिकारी. हे० मा. आंग्लो व्हं. स्कूल कारंजा यांनीं अनुमोदन दिल्यावर ती सर्वानुमतें पास झाली.

( ३ ) निरनिराळ्या शाळांतून आलेल्या पुस्त्यांपैकी बाक्षिसें देण्यालायक पुस्त्यांची निवड करण्याकरितां खालीं लिहिलेल्या गृहस्थांची सबकमिटी नेमण्या विषयीं रा. रा. गोविंदराव आसखेडकर, हे० मा० अं० व्हं० स्कूल आकोला यानीं सूचना केली. तीस रा. रा. अंताजीपंत खरे हे० मा० अं. व्हं. परतवाडा यानीं अनुमोदन दिल्यावर ती सर्वानुमतें पसंत झाली.

मराठी पुस्त्यां करितां.

१ रा० रा० रघुनाथ वामन देवभानकर हे० मा० अं० व्हं० जळगांव.
२ रा० रा० विश्वनाथ मोहनीराज „ „ कारंजा
३ रा० रा० बाळकृष्ण यशवंत „ व्हं० स्कू० कारंजा.
४ रा. रा. विनायक बळवंत चांदुरकर „ „ बासम.
५ रा० रा० गोपाळराव गोरे „ „ करजगांव.
६ रा. रा. जनार्दन केशव नगरकर हे० मा० अं० व्हं० स्कू० तळेगांव.

उर्दू पुस्त्या करितां.

१ मि० अब्बासखा हे० मा० हिं० शाळा अकोट.

२ शेख महमंद हुसेन अ० मा० ट्रेनिंग कालेज अकोला.

३ मि० अबदूल कादिर हे० मा० हिं० शाळा पातूर.

( ४ ) या नंतर बाहेरील शाळांतून आलेल्या सर्व सूचनांचा विचार झाला. एकंदर सूचना ११ होत्या. पैकीं बराच वादाविवाद होऊन खालीं लिहिलेल्या १० सूचना इनस्पेक्टर मंडळा कडे विचारा करितां पाठवाव्या असें सर्वानुमतें ठरलें.

( १ ) मराठी पांचवी यत्ता शिकलेला मुलगा इंग्रजी शाळेंत गेल्यावर त्यास तेथें १ वर्ष घालवावें लागतें व त्याची परीक्षा सर्व विषयांत घेतली जाते. असें न होतां त्याची फक्त इंग्रजीमध्यें परीक्षा घ्यावी व नंतर त्यास वरचे वर्गांत बसण्याची परवानगी असावी. ही सूचना उर्दू शाळांसही लागू असावी

( २ ) उर्दू शाळेंतील मुलें मराठी शाळेंत येतात. तर या संबंधी असा नियम असावा कीं उर्दू शाळेंत चौथी यत्ता पास झालेला मुलगा मराठी शाळेंत तिसऱ्या यत्तेंत घेतला जावा व तिसरी पास झालेला मराठी शाळेंत दुसऱ्या यत्तेंत घेतला जावा वगैरे असा नियम असावा.

( ३ ) ट्रेनिंग कॉलेजांतील नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें पास झालेल्या मास्तरास जो बढतीचा मार्ग आहे तो जुन्या मास्तरास खुला व्हावा ह्मणून जर कोणी जुना मास्तर नवीन क्रम खासगी रीतीनें अभ्यास करून संपविण्यास तयार असेल तर त्यास तसें करण्याची परवानगी असावी.

( ४ ) अभ्यासाचीं पुस्तकें वक्तशीर मिळत नाहींत त्यामुळें फार नुकसान होतें. करितां वक्तशीर मिळत जातील अशी व्यवस्था केली जावी.

( ५ ) बक्षीस पुस्तकें मिळतात तीं कधीं कधीं अगदीं निरूपयोगी असतात. असें न व्हावें.

( ६ ) प्रत्येक इंग्लिश मराठी शाळेला वेबस्टर व क्यांडी साहेब यांचे कोश असावेत.

( ७ ) राणीचे जन्मदिवसानिमित्त सुट्टी इतर प्रांतांतील शाळाप्रमाणें याही प्रांतांत दिली जावी.

( ८ ) पांचव्या व सहाव्या पुस्तकांतील शास्त्रीय धडे शिकविण्या करितां अवश्य लागणाऱ्या जिनसा शाळांना पुरविण्याची तजवीज व्हावी.

( ९ ) प्रायमरी शाळांमध्यें पांचव्या यत्तेला सहावें पुस्तक सर्व वाचना करितां ठेविलें आहे. तें फार आहे. इतकें वाचन संबंध वर्षांत व्हावें तसें होत नाहीं. करितां प्रत्येक यत्तेला २०० पाना पर्यंत भाग नेमला जावा.

( १० ) मराठी चोथ्या यत्तेला फक्त सरळ व्याजाचीं उदाहरणें ठेवावीं. मुदत मुद्दल, व्याजाचा दर यापैकीं प्रश्न घातले जाऊं नयेत.

दुपारीं २ पासून ४ पावेतों

१. रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत बी. ए. एल. एल. बी. वकील अकोला यांनीं आपल्या अमूल्य वेळेचा व पैशाचा ही बराच खर्च करून सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहायानें शरीरामध्यें रुधिराभिसरण कसें चालतें हें दाखविलें. हें चांगलें समजावें ह्मणून त्यांनीं मनुष्याचें व बकऱ्यांचीं काळिजें आणिलीं होतीं. त्यांतील शुद्ध व अशुद्ध रक्तवाहिन्या कोणत्या व कोठें असतात हें स्पष्ट करून दाखविण्याकरितां त्यांनीं एक हृदयाचा नकाशा काढून आणून त्याच्या छापील प्रती सर्वांस वाटिल्या व तद्वारें शरीरांत चालणाऱ्या क्रिया सांगून नंतर बेडकाच्या अंगांतील रुधिराभिसरण दाखविलें. हें व्याख्यान फार मनोरंजक आणि सर्वांस

उपयुक्त असें झालें. हें व्याख्यान देण्याचें कामीं येथील सिव्हिल सर्जन डा० रॅलो साहेब व डा० दादासाहेब कोल्हटकर यांनीं पुष्कळ मदत केली. या व्याख्यानाचे वेळीं मे० डायरेक्टर साहेब बहादूर हे हजर होते.

( पुढें चालेल. )

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध १५ शके १८२०

विलायतेस सरकारनें नेमलेल्या करन्सी कमिटी पुढें नाण्याच्या प्रश्नाविषयीं वाटाघाट चालू आहे आणि त्यांत मुख्य मुद्दा सरकारी टांकसाळ व्यापाऱ्यांस खुली करावी किंवा करूं नये या संबंधानें आहे. या प्रश्नाचा खल पुष्कळच झाला असून असें निष्पन्न झालें आहे कीं टांकसाळ व्यापाऱ्यासाठीं बंद ठेऊन रुपयाची वाढविलेली कृत्रिम किंमत कायम ठेविली नाहीं तर १२ कोट रुपयांची तूट सालिना पडेल असा सरसरीचा अंदाज आहे. याचा अर्थ असा कीं हल्लींच्या या कृत्रिम उपायानें बारा कोट रुपयांचा कर सरकारनें अप्रत्यक्षपणें बसविला आहे. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कर जास्ती देण्या इतकें सामर्थ्य इंडियन प्रजेंत नाहीं ही गोष्ट सरकारासही कळून चुकली आहे. सर वेस्टलांड यांनीं आपली फडणिशी किती ही गाजविली व इंडियाची धनदौलत लटकीच गाईली तरी सरकारचेच मोठे अधिकारी आंकड्यानिशीं विरुद्ध गोष्टी शाबित करीत आहेत. मि. जे. ओकेनेर यांची करन्सी कमिटीपुढें साक्ष झाली तेव्हां त्यांनीं स्पष्टपणें सिद्ध करून दिलें कीं इंडियाच्या खजिन्याची स्थिती चिंता करण्या सारखीच आहे आणि निराळे कर बसविण्याची सोय बिलकूल नाहीं. जमिनीचा सारा भरमार पूर्वींच वाढलेला आहे आणि तो आणखी वाढविला तरी २६ कोट रुपयांचे ३८ कोट रुपये कांहीं होणार नाहींत. १२ कोटीची तूट भरून काढणें मोठेंच कठिण आहे. मूळच्या साऱ्यावर एक दशांशानें रकम वाढविली तरी अवघे अडीच कोट रुपये भरून येतील. अफूवरील कर वाढविला तर भिती अशी आहे कीं सर्व उत्पन्नच ल्यास जाईल. मिठावर दरमणी अडीच रुपये सरकार कर घेतें हा कर ३ रुपया पर्यंत वाढविला तर ती गोष्ट अगदीं अन्यायाची होणार आहे. मीठावरील कर हा अर्थशास्त्रानें निषिद्ध आहे. तशांत या पदार्था सारखा आवश्यक दुसरा पदार्थच कोणता नाहीं. माणसा प्रमाणें गुरांला देखील मीठ हा जरूरीचा पदार्थ आहे. आणि सध्यां मीठावरचा कर १ रुपया पर्यंत उतरावा अशी लोकांची मागणी आहे. इनकम-ट्याक्स ५०० रुपयांच्या ऐवजी १०० रुपया खालील उत्पन्नावर घेऊं नये ही सूचना ध्यानांत धरून कर वाढविला तरी तूट भरून येणारी नाहीं. खरी सुधारणा खर्च कमी करण्यांत झाली पाहिजे. विलायतचें देणें रुपयामध्यें ठरविलें पाहिजे. इंडियाच्या आसमंतांतील लढायांचा व ब्रह्मदेश सारख्या जोडलेल्या प्रांताच्या कारभाराचा खर्च विलायतेवर अंशतः तरी बसवावा, मोठ्या अधिकाऱ्यांचे पगार कमी केले पाहिजेत आणि नेटिवांची भरती होईल तितकी अधीक झाली पाहिजे. हेच मार्ग खजिन्याची स्थिती सुधारण्याचे आहेत. राष्ट्रीय सभेनें व हितबोधाच्या गोष्टी कित्येक वर्षांपासून सांगण्याचा क्रम चालविला आहे पण सत्यभाषणाला सरकारापाशीं चांगला सा मानच मिळत नाहीं.

सन १८९८—९९ सालच्या अखेरीला सुमारें १० लक्ष रुपये वऱ्हाड प्रांतांत राज्यकारभारांत शिल्लक राहतील असा अंदाज आहे आणि एवढी शिल्लक निजाम सरकारच्या खजिन्यांत येत्या मे महिन्यांत पोंचविण्याचा विचार आहे. या प्रांताची व्यवस्थाच मोठी चमत्कारिक आहे. हा मुलूख वहिवाटीला इंग्रज सरकारच्या आहे पण कागदोपत्रीं धनीपणा निजाम सरकाराकडे आहे. निजाम सरकारला हा प्रांत कधीं काळीं परत मिळेल असा योग कल्पनेच्या बाहेरचा आहे. राज्यकारभाराचा खर्च भागल्यानंतर जी शिल्लक राहील ती निजाम सरकारची आहे असें ह्मणत असतात परंतु त्या शिल्लकेंतून सर्व रकम परत न देतां थोडथोडी रकम निजाम सरकारास देते असतात. वरवर पाहणाऱ्यांस वाटेल कीं या प्रांताचा कारभार मोठ्या वर्णनीय रितीनें चाललेला असावा कां कीं त्यांत तूट न पडतां १० लक्ष रुपये जमेला राहतील. या प्रांताची शिल्लक प्रस्तुत दाखवितात त्यापेक्षां खरोखर फार मोठी पाहिजे. वऱ्हाडांतल्या प्रमाणें राज्यकारभाराचा खर्च कोठेंच उधळपट्टीचा नाहीं आणि असा हा अमर्याद खर्च वर्षोंवर्ष वाढत आहे. खर्चाची वाढ एवढी प्रचंड आहे कीं शाळाखात्या सारख्या उपयुक्त खात्याचा उपासमारा करण्यांत येत आहे. विशेष नवलाची गोष्ट अशी कीं सरकारी सारा मूळचाच भारी होता तरी तो मन मानेल तसा वाढविला आणि उत्पन्न अतिशय वाढविलें असूनही सरकारची तृष्णा मुनसीपालिटीच्या उत्पन्नाकडे धांवली आहे. आमच्या सरकारासारखें दुर्धनिक दृष्टीचें नादार सरकार पृथ्वीवर कोठेंच आढळणार नाहीं. प्रजेला कराच्या पायीं नागविण्यापासून परिणाम फार भयंकर होतात. प्रजाही कामधेनू प्रमाणें आहे. दुधाच्या आते तृष्णेमुळें तिच्या स्तनांतून दूध न मिळतां रक्त निघूं लागेल. सरकार निजाम साहेबाला १० लक्ष देवोंत किंवा कितीही देवोत, प्रजा फार सत्वहीन झाली आहे ही गोष्ट आह्मी वारंवार सांगू इच्छितों.

## बोर्डाचे मेंबरांची निवडणूक.

नंबर ४

नियम ६ असा आहे कीं तालुक्यांतील मत देण्यास लायक ठरलेल्या लोकांची यादी प्रत्येक तहशिलीत तयार करावी, व ठेवावी. व वेळोवेळीं ती तपासावी. व तिच्या खरेपणाबद्दल तहशीलदार जबाबदार राहतील. ही यादी तयार झाल्यावर तिची एक नकल लोकांना दिसेल अशा ठिकाणीं तहशीलीचे पडवींत एका फळीला लाऊन ठेवावी.

" यादीच्या खरेपणा बदल तहशीलदार जबाबदार राहतील " असें नियमांत लिहिलें आहे. तथापि वऱ्हाडांत बोर्डाची सुरुवात झाल्या पासून मत देणारांची यादी चुकल्यामुळें अमुक एका तहशीलदारास जबाबदार धरलें गेलें असें ऐकिवांत नाहीं. यावरून उघड आहे कीं एक तर वऱ्हाडांतील प्रत्येक तहशीलींत ज्या याद्या तयार होतात. किंवा दुसरे पक्षी तहशीलदार लोक ज्या याद्या तयार करितात त्यांत चूक आहे किंवा नाहीं हें कोणी पाहण्याची काळजी घेत नाहीं.

आमचें मत असें आहे कीं ज्या अर्थी वऱ्हाडांत लोकल बोर्डाची संस्था सुरू होण्यास थोडींच वर्षे लोटलीं आहेत त्या अर्थी सर्व याद्या बिनचूक होत असतील अशी कल्पना करणें चुकीचें होईल. आमच्या ऐकण्यांत असें आहे कीं ह्या याद्या करण्याचें काम पुष्कळ तहशीलींत एका साधारण पतीच्या कारकुनाकडे सोंपविलें जातें व त्याचे मदतीस कांहीं पटवारी देण्यात येतात. यापेक्षा विशेष माहितगारीचें डोकें याद्या करण्याचे कामीं शिरलेलें नसतें. शिवाय अशा प्रकारें जी यादी तयार करण्यांत येते त्या यादीची नकल वरील नियमांत लिहिल्याप्रमाणें लोकाला दिसेल अशा उघड ठिकाणीं कित्येक तहशीलींत लाऊन ठेवलेली नसते. यामुळें मतदाराच्या निवडणुकीचे कामीं फारच घोंटाळा होत असतो.

या आमच्या ह्मणण्याची सत्यता कोणाला पाहवयाची असेल तर जे दिवशीं तालुक्यांत बोर्डाचे मेंबराची निवडणूक होते ते दिवशीं घटकाभर निवडणुकेच्या ठिकाणीं जाऊन बसावें ह्मणजे त्यांस दिसून येईल. खरोखर ज्या दुकानांतून टाऊन फंडा बद्दल व शेत साऱ्याबदल करा ऐवजीं व पट्ट्या ऐवजीं मोठ्या मोठ्या रकमा सरकारांत दिल्या जातात, त्या दुकानचे शराकतदारांची, एजंटांची, व मुनीमांची नांवें बरोबर रीतीनें नोंदलीं गेलीं नसल्यामुळें त्याला पोलिंग आफिसर पुढें उभें केलें असतांही विन्मुख जावें लागतें. तसेंच जो मनुष्य तालुक्यांत शेकडो रुपये सारा भरतो त्याचें नांव व्यवस्थित रीतीनें नोंदलें गेलें नसल्यामुळें त्याची ही वर प्रमाणें व्यवस्था होते. असे अनेक प्रकारचे घोटाळे होत असतात.

यांस कारणें दोन आहेत.

१ ज्या सरकारी अंमलदाराकडे अशा प्रकारचें काम सोंपविलें असतें त्या कडून तें काळजीनें होत नसतें.

२ लोकही आपल्या हक्का विषयीं जितके अनभ्यस्त आहेत तितकेच ते निष्काळजीही आहेत. व त्यांना ते कसे अमलांत आणावेत हें माहीत नसतें.

आज येथें पहिल्या कारणाचा विचार करूं.

तहशीलदार लोकांस मतदार लोकांची यादी तयार करण्याचें काम स्वाभाविक रीतीनें मोठें महत्वाचें वाटत नसतें. इतकेंच नाहीं तर कित्येक तहशीलदारांस बोर्डाची संस्था ही सरकारी नसून खाजगी संस्था आहे असें वाटतें. खरोखर तहशीलदार लोक बोर्डाचे कामाकडे जरा कळकळ दाखवितील तर आतां पेक्षां खात्रीनें बोर्डाचें काम चांगल्या रीतीनें चालेल.

गेल्या सालचे बोर्डाचे रिपोर्टीत कमिशनर साहेबांनीं व रेसिडेंट साहेबांनीं असें लिहिलें आहे कीं वऱ्हाडांतील लोकांस बोर्डाची अभिरुचि नाहीं. यामुळें लोकनियुक्त निवडणुकीची पद्धत वऱ्हाडांत ठेवण्यास फायदेशीर नाहीं. करितां लोकनियुक्त सभासदां ऐवजीं सरकारी निवडणुका होतील तर बरें. कमिशनर साहेबांच्या व रेसिडेंट साहेबांच्या शिफारशी प्रमाणें निवडणुके ऐवजी शिफारशीची व्यवस्था सुरू करण्याची खटपट चालू आहे असें समजतें.

वर लिहिले प्रमाणें कमिशनर व रेसिडेंट साहेबांनीं वऱ्हाडांतील लोकांस लोकनियुक्त संस्थेची आवड नाहीं करितां ती येथें चालणें शक्य नाहीं असें ह्मणणें कदाचित रास्त होईल. कारण ते वरिष्ट अधिकारी असल्यामुळें त्यांचें मत बहुधा रिपोर्टीतील आंकड्यावरून होत असतें. परंतु तहशीलदार लोकांनीं अशा प्रतीचे आंकडे रिपोर्टांत जाऊं द्यावे हें त्यांस खरोखरच लांच्छनास्पद आहे.

आमचे ऐकण्यांत अशी एक आख्यायिका आहे कीं मे० हेअर साहेब डे० कमिशनर यांनीं अकोट येथें मि० मुबारक अली तहशीलदार असतांना त्यांस सांगितलें होतें कीं सरकारानीं स्थानिक स्वराज्य वऱ्हाडांत दिलें आहे परंतु मत देणाराची व घेणाराची योग्यता तुह्मा लोकांवर अवलंबून आहे. तर ही गोष्ट निवडणुकेचे वेळीं तुह्मी लक्षांत ठेवावी. या कळकळ्याचे उपदेशाचा असा परिणाम झाला कीं त्या सालीं शेंकडो मत देणार लोक निवडणुकीचे दिवशीं तहशीलींत हाजर राहिले व कित्येक दिवस निवडणुकीचें काम चाललें.

यावरून वाचकाच्या लक्षांत येईल कीं या कामीं " कर्तुम कर्तुम न्यथा कर्तु " ही शक्ति फक्त तहशीलदार लोकांतच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आणि जों पर्यंत ते स्वतः बोर्डाचे कामांत कळकळ बाळगीत नाहींत किंवा जो पर्यंत तसें करणें त्यांना भाग पडत नाहीं तो पर्यंत बोर्डाचें काम कधीही नांवा रूपास येणार नाहीं. ह्मणून आह्मी सर्व लोकां तर्फे तहशीलदार लोकांस अशी विनंती करितों कीं सरकारी या नात्यानें ह्मणा किंवा समाजांतील आपण घटकावयव आहांत ह्मणून ह्मणा, किंवा नीति दृष्टया ह्मणा यशापयशाचें खापर आपले मस्तकीं फुटणार आहे. ही गोष्ट मनांत आणून आपण बोर्डाचें कामीं जरा विशेष कळकळ बाळगावी.

या प्रसंगीं जिल्ह्याचे अधिकारी डि. क. साहेब यांसही सर्व लोकांतर्फे आमची अशी विनंति आहे कीं आपण बोर्डाचे कामीं जरा विशेष नजर पुरविल्या शिवाय नुसत्या तहशिलदाराकडून तीं कामें कधींही शेवटास जा-

णार नाहींत. स्थानिक स्वराज्य ही केवळ थट्टा नसून सरकारांनीं सद्धेतुनें रयतेसही देणगी दिली आहे. ही गोष्ट जर खरी आहे तर हरतऱ्हेनें ती पूर्ण फलद्रुप झालीच पाहिजे. ज्या वेळीं डे० क० साहेबांची स्वारी तालुक्यांत तपासणी करितां जात असते त्या वेळीं तहशिलीची तपासणी जशी होत असते त्या प्रमाणें बोर्डाची तपासणी होऊन प्रसंग विशेषीं कानपीळीचे पागोटें तहशिलदारांना इनामादाखल देण्यांत येईल तर थोड्याच दिवसांत या बोर्डाचें स्थित्यंतर होईल अशी आमची खात्री आहे.

( पुढें चालूं. )

## The Berar Samachar

**MONDAY, NOVEMBER 28 1898**

The Berar Social Reform Association is doing well under the auspicies of Mr. Vishnu Moreshwar Mahajani M. A. He is the central figure in Berar. What Mr. M. G. Ranade is to the Deccan Maharastra Mr. Mahajani is to this province. He is very moderate in his ideas of social reform. He never advocates isolation in matters of reform. His attempt is in the direction of moving the whole society. He does not avoid resistance but tries to smoothen the surface so as to make resistance felt with the least possible force. Individual acts of isolated reforms have no meaning and significance with him. He advocates action but is rather more careful to prepare the ground for action. He inculcates the reform of the mind and when that is achieved action will follow as a sequel to it. With him there is no exhibition of misconceived reforms in all their deformities. He is an examplar in personal life of purity and wields a large moral influence.

The Berar Reform association held its annual meeting on Thursday last in the Native General Library. Mr. Mahajani delivered an eloquent and learned inaugural address. Therein he gave the general out-lines of the social reform and philosophised upon the past history of reform so as to give a decisive tone and coloring to our movements. He condmned the hysteric and farcial activities of certain so-called reformers and took the large audience in confidence when he grew eloquent in explaining what real reforms meant and directing special attention to court the opinions of anti-reformers. Truth lies in a sort of *middle*. It is incapable of definition but not impossible to be discerned. Opposition should be a great help to find out the truth. It should not be [illegible]gine of oppression but should be directed to thresh out truth in its true light. Mr. Mahajani understands social reforms to be the foundation-stone of all reforms in the manifold departments of life. The whole structure of reform will be an admirable and permanent building if we are sure of the basal foundation and of the materials that we use in building thereon. The individual men that form a society are the architects and with them lies the success and excellence of the whole social fabric. The vitality of a society is to be gauged from that of the members composing it. This leads thinkers to compare a society to a human body or a living tree. But a society is something more. Mr. Mahajani explained in a learned style that it knows no death. This is the peculiarity and we are asked not to miss this point. In the immortal words of Burke, a society is a permanent body composed of transitory parts." It moulds together the great mysterious incorporation of the everchanging component parts. The whole social polity moves through the varied tenour of perpetual decay, fall, renovation and progression. To move a society is a stupendous work and is not within the reach of a limited number of its individuals. The light of knowledge will alone adjust the march of events and people will in due course adapt their life to the surrounding circumstances. We do not like Mr. Mahajani's ideal to remove the collapse or the swoon of our society by administering strong and powerful drugs. Neither do we approve of the hasty proposals of Mr. M. V. Joshi to invoke legislation in matters of reform. The state aid is the last resource in case of the worst social anomalies. If the cause of reform fails, we are to argue that the soil is not culturable. Our attempts must be to train the mind and then action will be the necessary sequence of such a training. This sort of a training is to be imparted by means of individual efforts. Let each one who is a real reformer, move along the lines of strict morality, honesty and purity, Let him be a living example to his countrymen without distubing the social harmony of the general public Whatever is good will command public acceptance-and it is for eformers to prove what tends to the greater happiness of the greatest number. The present is always a reform on the past and a foundation for the future. Let us try to increase good fellow felling and the harmony of the whole society will then be a certain and sure result.

## वऱ्हाड

हवामान—थंडीचें मान साधारण आहे. या जिल्ह्यांत पाण्याची कमताई विशेष आहे आणि तिचा तडाखा या वेळे पासूनच भासूं लागला आहे. रोगराई कांहीं असून सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे. मुंबई कडील प्लेगाची भीती मूळची होतीच; हिंगणघाटास गेलेले कांहीं मुंबई भागाकडील कामकरी लोक प्लेगानें मेल्यामुळें प्लेगाची मोठी दहशत पडली आहे. स्वच्छते विषयीं कडक अंमलवारी चालू आहे. ईश्वर करो आणि हें विघ्न टळो !

शाळा खात्यांत खालील नेमणुका व वर्गावर्गी करण्यांत आल्या:—

| रा. रा. | बदलीचें ठिकाण |
|---|---|
| दामोदर कृष्ण टिळक व्हाइस प्रिन्सिपाल, ट्रेनिंग, कालेज, आकोला | देऊळगांवराजा हेडमास्तर |
| गणेश बाबाजी एकबोटे | खामगांव हेडमास्तर |
| दत्तात्रय त्रिंबक भावे | ट्रेनिंग कालेज |

नबाब मोहिनुद्दीन असिस्टंट कमिशनर आकोला यांची बदली उमरावती जिल्ह्यांत झाल्या प्रमाणें ते काल रोजीं दिवसाच्या गाडीनें रवाना झाले. नाबाब साहेब तरुण गृहस्थ असून त्यांनीं आपल्या विद्वत्तेच्या जोरावर डिपार्टमेंटल परीक्षा दिवाणी खेरिज इतर विषयांत फार लवकर दिली. कामाचें धोरण त्यांस चांगलें समजून आलें आणि ते आतां दिवाणी व फौजदारी कामें चांगल्या अनुभवी अधिकाऱ्या प्रमाणें करूं लागतील. त्यांस सध्यां धामणगांवीं प्लेगाच्या कामावर जावें लागेल. त्यांस लवकर माजिस्ट्रेट वर्ग २ चे अधिकार मिळतील. हे स्वभावानें चांगले असून आपल्या कामांत चोख व प्रामाणिक आहेत.

राजश्री दयालभाई भाटे यांनीं आकोटच्या मुलीच्या शाळेला शिवणकामा निमित्त पांच रुपये देऊन दरसाल १२ रुपये वर्गणी देण्याचें कबूल केलें आहे. ही देगणी स्तुत्य होय.

'प्रभात' पत्रकर्ते लिहितात कीं इलिचपूरचे सद्गृहस्थ रा. रा. नाना काळी हे गेल्या एकादशीला मोठ्या सुखासमाधानीनें ईश्वरभजन करीत करीत निवर्तले. त्यांचें वय ७९ वर्षांचें होतें.

मे. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर आकोला यांची स्वारी खालील मुक्कामाला येत्या आठवड्यांत जाणार आहे:—

| मुक्काम | तारीख |
|---|---|
| महान. | २८ नोवेंबर. |
| बारशीटाकळी | २९ |
| | ३० |
| चिखलगांव | १ दिसेंबर. |
| पातुर शेखबाबू. | २ |
| | ३ |
| माळ राजुरा | ४ |
| अलेगांव | ५ |

मे. बी. ले असि. कमिशनर हे पुढील महिन्या पासून बाळापूर तालुक्यांतून दवऱ्याला प्रारंभ करितील.

रा० रा० नारायण मोरेश्वर रहाळकर बी. ए. डिपुटी क्लार्क निसबत जुडिशियल कमिशनर यांस इतर वर्गावर्गीमुळें खाला खात्यांत परत यावें लागलें आणि मे० डायरेक्टर साहेबांनीं त्यांस ७५ रुपयांवर येथील हायस्कुलांत बढती दिली.

रा० रा० दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. आक्टींग तहशीलदार, बाळापूर यांनीं मि. अबदूल कडूस यांस तहशिलदारीचा चार्ज दिला व ते उमरावती हायस्कुलांत आपल्या मूळच्या जागीं रुजूं झाले, आणि त्यामुळें रा० रा० श्रीधर परशराम सोमण बी. ए. यांची बदली आकोल्याच्या ट्रेनिंग कालेजांत झाली.

रा. रा. नारायण पांडुरंग जोशी, एक्स्ट्रा असि. कमिशनर, यांस बुलढाण्यास सिव्हिल जज्जाचे जागीं बदलण्यांत आलें.

### NOTICE

It is hereby published for general information, that the Assesment Lists regarding the tax on Buildings and Lands prepared by the Committee under section 55 of the Berar Municipal Law, are kept at the Municipal office open for inspection and that they may be seen there, during office hours (11 A.m. to 5 p. m.)

Extracts from the same will be allowed to be taken free of charge, in the presence of the Head Clerk.

Persons interested are requested to see therein their personal liablities, and to put in their objections if any, to the same in writing, within thirty days from the date of the publication of this notice. No objections or complaint will be heard, if it is submitted later than the above date.

Akola 28th. November 1898.

K. G. Damle
Secretary
M. Committee
Akola.

## जाहिरनोटीस

ह्या जाहीर नोटिसीनें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं म्युनिसिपल कायद्यांतील कलम ५५ प्रमाणें कमेटीनें घरपट्टीच्या आकारणीच्या याद्या तयार केल्या आहेत त्या कमेटीचे आफिसांत आफीसचे वेळेंत ( ११ वाजे पासून ५ वाजे पर्यंत ) पाहण्यास मिळतील व वाटल्यास त्यांतून उतारे कांहीं फी न देतां हेड क्लार्कचे समक्ष करून घेतां येतील.

सदरहू आकारणीबद्दल ज्या कोणाची तक्रार असेल त्यांनीं ह्या नोटिसीचे प्रसिद्धीचे तारखे पासून तीस दिवसांचे आंत ती कमेटीचे आफिसांत लेखी करावी त्या नंतर तक्रार आणल्यास ऐकली जाणार नाहीं कळावें,

ता० २८।११।९८ इसवी.

K. G. Damle.
सेक्रेटरी.
म्यु० कमिटी आकोला.

### नोटिस

रा० रा० रंगो रामचंद्र वकील राहणार कजबे अकोले यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचे राहते घराचे प० कडून तुमचे मालकीची पडीत खुली जागा आहे. ती जागा तुह्मी गफूरमहमद वा भोलुभाई मुसलमान यास चार वर्षांपासून जळाऊ सरपनाचे लाकडे ठेवण्यास भाड्यांनीं दिली त्या लाकडाचे गंजी मुळें बरसातीचें पाणी इमारतीचें पायांत मुरून जागजागी माझ्या भिंती तडकल्या आहेत ही नुकसानी आपण केली या शिवाय लाकडाचे गंजीस आग लागून जळल्यास आमचे इमारतीस धोका आहे. त्याच लाकडाचे गंजी वरून घरांत चोर येण्याचा व नुकसानी होण्याचा संभव आहे. त्यास सर्व नुकसानीचे जबाबदार तुह्मी आहेत. झालेल्या नुकसानी बद्दल आमचा आपसांत निकाल करून सदरील जागा वस्तीस द्यावी हे कळावे ह्या नोटिसी प्रमाणे तजवीज. नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत लेखी जबाब द्यावे. तारीख २६।११।९८ इसवी.

( सही )
सुंदरलाल कायत हल्ली राहणार
अकोले.

## ॥ श्रीर्जयतितराम ॥

— मंत्र रामायण नं. ६

—बालकांड—

' श्रीकांत पैत्र भगवत्पद पद्मभृंग सद्योगी जगद्धितोद्यमी ' नारद मुनी वाल्मिकि ऋषीच्या आश्रमास येऊन त्यास ' रावचरित्र भावें गावें ' असें सांगून गेला यावर कांणे एके दिवशीं तो स्वशिष्य समवेत तमसा नदीच्या तीराला गेला अप्तनांना

स्मरेषु विद्धाते ।

क्रौंच खगाते पाहे निजपाल्नि प्रीति

पाश बद्धाते॥

इतुक्यांत 'निष्करुण यमतुल्य निषादानें' त्यास विद्ध केलेलें पाहून वाल्मीकि मुनीस राग येऊन त्यास शाप दिला तोंच छंदोमयी वाक् निघून गेली. ही वाणी सर्वत्र प्रसिद्धच आहे. वेद व उपनिषदें यांचा काल निघून गेल्यावर केवळ व्यवहारिक विषयावर ही प्रथमच छंदोमयी वाणी होय. यावर ब्रह्मदेवांनींही या मुनीस आशिर्वाद देऊन

यक्षवरानुज रिपुचें अतिपूताचरित

नैकपद्यांही ।

ह्यांहीं वर्णावें; त्वत्कृति नेमिजेल ते

सुविद्यांहीं ॥

असा निदेश केला. यावरून त्यानें सूर्य कुलोद्भव राजा रामचंद्र याचें चरित्र तयार करून तें त्यांच्याच पुत्राकडून ताल सुरावर ह्मणावयास लावलें; त्यांतील कथेचा सारांश सर्वजनश्रुत आहे तथापि तोच पुन्हां एकदां देतों:—

कोसल देशांत अयोध्या नामक पुरींत अजसुत दशरथ नामें करून एक प्रख्यात राजा होऊन गेला. या राजानें

मखवन प्रौढ करें,

धर्मपरें, देवकार्य सिद्धिकरें ॥

दशरथ नृवरें केलें

त्रिभुवन धवल स्वसद्यशः प्रकरें ॥

त्यास पुष्कळ भार्या होत्या; त्यांत कौसल्या ही महिषी होय. सुमित्रा तिच्याहून धाकटी व कैकेयी ही तिसरी परंतु राजाला अतिशय प्रिय होती. त्यास पुष्कळ दिवस पुत्र न झाल्या कारणानें त्यानें पुत्रकामेष्टि यज्ञास प्रारंभ केला. त्यावेळेस त्या राजाचा सुमंत्री नामक एक चतुर अमात्य होता त्यानें ऋष्यशृंगास या यज्ञास आणून यज्ञसिद्धि साध्य केल्यास ' अनन्यलभ्य पुत्रसुख ' होईल असा विधिकृत नेम आहे असें सुचविलें. त्या प्रमाणें राजानें या ऋषीसही यज्ञास आणिलें.

इकडे लंकाधिपती ब्राह्मण राजा रावण यानें आपल्या बुद्धिचातुर्यानें राक्षस नामक त्यावेळच्या अतिशय दांडग्या व अडाणी लोकांची सेना तयार करून सर्व सुरासुर गंधर्व, यक्ष, किन्नर, मनुज यास जिंकून त्रास देण्याचें काम चालविलें होतें. त्याचा उच्छेद व्हावा ह्मणून ' नलजोम्दव पुरस्कृत ' सर्व देवसेना ' शेषशायी

' शरणागत जन संघृति मीतिघ्वांत प्रभंजने

करवी '

अजित ' भगवंताची प्रार्थना करावयास गेली. तेथें तिला मी दशरथ राजाचे पोटीं जन्म घेऊन त्या ब्राह्मणाधमाचा विध्वंस करीन असें अभिवचन मिळालें. येथें लंकाधिपती रावण हा जातीनें ब्राह्मण होता हें विसरतां कामा नये व केवळ याच्याच त्रासानें चतुर्वर्णाचें एक्य होऊन ते याचे निधन चिंतित होते अशी वस्तुस्थिती असून ब्राह्मणावर पक्षपाताचा दोषारोप करावयास आमचे शूद्रबंधु मागें पुढें पहात नाहींत ही गोष्ट लक्षांत ठेवण्या सारखी आहे.

इकडे दशरथ राजाचा यज्ञ समाप्त झाल्यावर ' प्राजापत्य पुरुष ' साक्षात् यज्ञो नारायण प्रगट होऊन त्यानें

पायस परिपूर्ण हेमपात्रातें

दिले. तें दशरथ राजानें पट्टमहिषी कौसल्या व प्रिय भार्या कैकयी या दोघींत वाटून दिलें परंतु सुमित्रेस कांहींच भाग नाहीं ह्मणून राजास फार वाईट वाटलें यास्तव दोघींनींही स्वसंतोषानें व निर्मत्सर बुद्धीनें आपआपल्या भागांतील अर्धे भाग तीस दिला. यथाकालीं तीघीही अंतर्वत्नी होऊन प्रथम कौसल्येच्या उदरीं

जन्म ज्येष्ठ सुताचें मध्यान्ही चैत्रमास

सितपक्षीं ।

झालें कर्कट लग्नी नवमीं दिवसीं पुनर्वसु

स्वर्क्षी ॥

या नंतर कैकेयीस भरत व सुमित्रेस लक्ष्मण व शत्रुघ्न या प्रमाणें दशरथ राजास चार पुत्र झाले. यांचा यथाकालीं उपनयन विधि झाल्या नंतर

राक्षस पीडाव्याजे कौशिक मागोंनि

दशरथा जवळी ।

हृदयीं रामाभिध निज पुण्य फलाते

महासुखें कवळी ॥

या रामचंद्राच्या लहानपणच्या प्रवासानें त्यास बलातिबला विद्या प्राप्त झाल्या, व प्रथमच युद्ध करण्याचा ही प्रसंग आला. यांत रामानें पराक्रम, साहस शौर्यादि गुण दाखवून भावी थोरपणाच्या इमारतीचा भक्कम पाया घातला. वाटेनें प्रथम गौतम जायेचा उध्दार करून रामचंद्र कौशिकऋषी बरोबर जनक राजर्षीकडे गेला. येथें रामानें अतुल बल शिवचाप भंगून सीता नामक भार्याहि संपादन केली. येथेंच चारही भावांचीं लग्नें होऊन स्वजनकासह सर्व मंडळी अयोध्या नगरीस जाण्यास निघाली. वाटेंत शिवचापध्वंस कुपित श्रीकंठाशिष्य भार्गव नामक ब्राह्मण वीराचा पराभव रामचंद्रानें केला. या पराभवाचें वर्णन ही सर्व ब्राह्मण कवि मोठ्या भक्तीनेंच करितात ही दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्या सारखी आहे. या प्रकारें

राजा पुत्र चतुष्टय लाभे अनुरूप तद्वधू

लाभें

' मत्सम सुखी न कोणी लोक ' ह्मणे

' मृत्युचेंहि न मला भें ॥

मनुष्याची इच्छा एक व नियति बलानें घडून येणारी गोष्ट दुसरीच असते. या सौख्यांत कांहीं दिवस राहिला असेल नसेल तोंच दशरथ राजावर आलेला भयंकर प्रसंग, पितापुत्राचा ऐनें यौवराज्याभिषेकाच्या दिवशीं झालेला वियोग, भरतानें केलेला राजाचा अव्हेर व चौथे पुत्र असतांना केवळ पादुका ठेऊन राज्याची व्यवस्था इत्यादि अगदीं विलक्षण गोष्टी केवळ नियति शक्तीच्या दररोजच्या खेळांतील अतिशय अल्प असा एक खेळ होय.

( पुढें चालेल )

---

नवीन.

## क्रिमिनल प्रोसीजर कोड.

### सन १८९८ चा आक्ट ५.

सटीक. ( आवृत्ति ४ थी. )

चारी हायकोर्टाचे निवाडे, मुंबई हायकोर्टानें केलेले वटहुकूम व विशेष समजुतीच्या टिपा आणि खेरिज जरूर लागणारे फौजदारी आक्ट सुमारे १४ यांसह छापत आहे. सन १८९९ सालचें मार्चे अखेर तयार होईल. ता० १५ जानेवारी सन १८९९ चे आत आगाऊ किंमत भरणारास किंवा व्ह्याल्युपेएबलनें मागविणारास टपाल खर्च सुद्धां रुपये ५ पडतील. मागाहून घेणारास टपाल हंशील सुद्धां रुपये ७ पडतील.

पुणें न्यायाश्रय अ.फीस. ता० १०।११।९८

नरहरराव त्रिंबक राजमाचीकर.

शिवराम हरी सांठे

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफीकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८६० चा अक्ट २७ कलम १ प्रमाणें.

दि० कि० मुकद्दमा नंबर ७ वर्ग १९

---

१८९८

विद्यमान मुनशी अझिजुद्दीन साहेब असिस्टंट कमिशनर साहेब जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टात.

नांव— रंगास्वामी.

बापाचे नांव — बरांअप्या जात तेलंग कुणबी सुभेदार मेजर.

राहणार— परतवाडा तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर यांस. मयत.

दुरगमा जवजे बरांअप्या तेलंग कुणबी राहणार परतवाडा तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर.

यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं यांनीं तारीख २२ माहे दिसेंबर सन १८९८ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी,

तारीख १८ माहे नवेंबर सन १८९८ इसवी.

Azizuddin

ज्यडूज.

---

## वर्तमानसार

गेल्या नाताळांत एका हिंदी गृहस्थानें देशी पापड नमुन्याकरितां ह्मणून विलायतेस पाठविले होते ते वेळीं तेथील लोकांची त्यावर इतकी गर्दी पडली कीं, दर नगास आठ आण्याचा भाव आला ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी नाहीं काय! लक्षांत घेऊन फायदा करून घेतला पाहिजे.

शिकागो शहर कसें श्रीमान झालें आहे पहा. एकानें एक जमिनीचा तुकडा प्रथम १२० पौंडास विकत घेतला. तोच त्यानंतर २० वर्षांनीं ८००० पौंडास विकला आणि आज तोच ३६ लक्ष पौंडाच्या किंमतीचा झाला आहे.

स्वीडन देशांत लहान मुलां या दंगामस्तीची एक स्वतंत्र खोली असते त्याशिवाय दुसऱ्या खोलींत तीं मुलें असलीं तर बिलकूल गडबड करीत नाहींत. धा. वा.

आफ्रिकेंत गेले—दापोली येथील पुरुषोत्तम जोशी, मनोहर आणि रामजी या नांवाचे तिघे होतकरू गृहस्थ विजयादशमीचे सुमुहूर्तानें आफ्रिकेंत उद्योगधंद्यासाठीं गेल्याचें तेथील एक गृहस्थ कळवितात. सदरहू होतकरू गृहस्थाचें धैर्य व उद्योगप्रीति फारच वर्णनीय होय. दापोलीकडील कांहीं लोक पूर्वींच आफ्रिकेंत गेलेले आहेत, ते अशिक्षित असतांही तिकडून चांगली किफायत करून इकडे पाठवितात, तें पाहूनच या मंडळीला बहुधा उत्तेजन आलें असेल.

नवे गव्हरनरजनरल लार्ड कर्झन हे हिंदुस्थानांत आल्यावर शिंदेमहाराज जानेवारी महिन्यात त्यांस भेटण्याकरतां बहुधा कलकत्यास जातील असें वाटतें.

सरहद्दीवरील चोरट्यांशीं एक सामना होऊन त्यांत एक काबुली आफीसर व दोन शिपायी ठार झाले.

हिंदुस्थानास नवे येणोर गव्हरनरजनरल लार्ड कर्झन यांस विलायतेस मेजवान्या वगैरे होऊं लागल्या. ता. २८ रोजीं झालेल्या एका मेजवानींत ते ह्मणाले कीं, " हिंदुस्थानावर माझी प्रीती आहे ह्मणून हिंदुस्थानच्या गव्हरनरजनरलची जागा मी आनंदाने कबूल केली. हिंदुस्थानचें राज्य इंग्लंडाने जरी तरवारीनें घेतलें आहे तरी तें आतां न्यायानेंच आपल्या ताब्यांत ठेवलें पाहिजे, आणि हिंदुस्थानांत महाराणीचा अंमल चालविणाऱ्या गव्हरनरजनरल त्याणें हिंदुस्थानातल्या लोकांच्या इच्छा व समजुती यांस मान देऊन सरहद्द सुरक्षित ठेवली पाहिजे. " या बोलण्याचा अनुभव कसा काय येतो हें आतां पाहाणें आहे.

ठा० अ०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाड समाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.